। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २५६ वा । गुरूवार दिनांक २५ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोयाबिन व तुरीच्या कट्ट्याची गोदाम फोडून केली चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विनोद भालचंद्र पतंगे, वय ६१ वर्षे, रा. भाउसारपेट गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे गुंजोटी शिवारातील पदमा इंडस्ट्रिज नावाचे पत्र्याचे गोदामातील ११ कट्टे सोयाबीन, तुरीचे ५ कट्टे, सुभाष जगन्नाथ पतंगे यांचे १९ कट्टे सोयाबीन व चंद्रकांत जगन्नाथ पतंगे यांचे २१ कट्टे सोयाबीन असा एकुण ९१,५०० किंमतीचा माल हा दि.२१.१२.२०२५ रोजी १४.३० ते दि.२२.१२.२०२५ रोजी ०९.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विनोद पतंगे यांनी दि.२३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### पर्स मधील ३९ ग्रॅम सोन्याचे दागिण्याची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुकुमार अंतलेश्वर सुरवसे, वय ४० वर्षे, रा. बालाजी नगर धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.१८.१२.२०२५ रोजी जुने बसस्थानक तुळजापूर येथे बस मधून उतरत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून सुकुमार सुरवसे यांचे पर्स मधील ३९ ग्रॅम सोन्याचे दागिने एकुण १,५६,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुकुमार सुरवसे यांनी दि.२३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### सोलारपंप व केबलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी औदुंबर गोवर्धन तावरे, वय ४९ वर्षे, रा. पिंपळगाव लिंगी ता. वाशी जि.धाराशिव यांचे पिंपळगाव लिंगी शिवारातील शेत गट नं ४३५ मधील विहीरीतील अल्टेक सोलार कंपनीचा ३ एच पी चा सोलार पंप व केबल असा एकुण २३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-औदुंबर तावरे यांनी दि.२३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ऑईलचे बॉक्सची चोरी

येरमाळा पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-गोविंद उध्दवराव घुले, वय ४९ वर्षे, रा. तेरखेडा ता.वाशी जि. धाराशिव यांचे रत्नापुर शिवार दुधाळवाडी पाटी येथील सोनालिका ट्रॅक्टर्स श्रीराम मोटर्स शोरुमचा काचेचा दरवाजा आरोपी नामे-अनिकेत संजय अडसुळ, वय २२ वर्षे, रा. ईटकुर ता. कळंब ह.मु. बाबानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१३.१२.२०२५ रोजी .फोडून नुकसान करुन आत प्रवेश करुन २०-२० लिटरचे हायड्रोलिक ऑईलचे बॉक्स एकुण १४,०००किंमतीचा माल चोरुन नेला. दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या स्मृतीस राजाश्रय: धाराशिवमध्ये उभे राहणार भव्य स्मारक!-पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती



धाराशिव : (२४ डिसेंबर) साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची ज्योत पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी,या उदात्त हेतूने धाराशिव शहरात भव्य स्मारक उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

या निर्णयानुसार धाराशिव नगरपालिकेला सर्व्हे क्रमांक ४२६ येथील आवश्यक १ एकर जमीन भोगाधिकार विनामूल्य, मूल्यरहित व महसूलमुक्त किंमतीने उपलब्ध करून देण्यास कॅबिनेटची मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या स्वप्नाला अधिकृत आणि ठोस स्वरूप प्राप्त झाले आहे.जमीन नगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत पुतळा उभारणीसाठी आवश्यक सर्व परवानग्या देण्यात येणार असून प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाणार आहे.

या स्मारकाच्या उभारणीसाठी नगरविकास विभागाने २ कोटीं रुपयांचा निधी मंजूर केला असून,या निधीतून स्मारक भव्य, दर्जेदार व प्रेरणादायी स्वरूपात साकारले जाणार आहे.

पालकमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते,तर ते शोषित,वंचित आणि कष्टकरी समाजाचा बुलंद आवाज होते.त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी हे स्मारक उभे राहत असून,ते सामाजिक न्याय,समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक ठरेल.

धाराशिवच्या भूमीत उभे राहणारे हे स्मारक भावी पिढ्यांना प्रेरणा देणारे,परिवर्तनाची जाणीव करून देणारे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे तेज सदैव उजळवत ठेवणारे ठरेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## तुमची ठेव,तुमचा अधिकार - जिल्ह्यात दावा न केलेल्या ठेवींच्या वितरणासाठी मेळावा

धाराशिव (जिमाका) जिल्हा अग्रणी बँक,धाराशिवने विविध बँकाच्या माध्यमातून बँकेत दावा न केलेल्या ३१ कोटी ठेवी १ लाख ३१ हजार खातेदारांना परत मिळवण्याकरता जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता मेळावा आयोजित केला आहे.हा मेळावा केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या देशव्यापी आपली पूंजी,आपला अधिकार - Your Money, Your Right उपक्रमाचा एक भाग आहे.

या मेळाव्यास मैनाक घोष,मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, धाराशिव तसेच विद्याचरण कडवकर, निवासी उपजिल्हाधिकारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.भारतीय रिझर्व बँकेचे अधिकारी,तसेच जिल्ह्यातील सर्व बँकेचे जिल्हा समन्वयक व एलआयसी अधिकारी या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.

या मोहिमेचा उद्देश १० वर्षांहून अधिक काळ व्यवहार न झालेल्या बँक खाती,मुदत ठेवी आणि इतर आर्थिक मालमत्तांबद्दल (उदा.शेअर्स, विमा) लोकांना माहिती देणे आणि कायदेशीर वारसांना/दावेदारांना ती रक्कम परत मिळवण्यासाठी सहाय्य करणे हा आहे. भारत सरकार व भारतीय रिझर्व बँक यांच्या माध्यमातून देशभरात एक ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कलावधीत मागील १० वर्षांमध्ये ज्या खात्यांमध्ये व्यवहार झालेले नाहीत, आशा खात्यातील ठेवी भारतीय रिझर्व बँकेच्या नियमांनुसार ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधीमध्ये (डीईएएफ) हस्तांतरित केल्या जातात.बरेच लोक माहितीच्या अभावी अथवा मृत असल्याने या ठेवी परत मिळवण्यासाठी पाठपुरवठा करत नाहीत.पर्यायाने या ठेवी डीईएएफमध्ये हस्तांतरित होतात. अशा सर्व ठेवी योग्य ती कागदपत्रे बँकेत जमा करून ठेवींची रक्कम खातेदाराला अथवा वारसदाराला मिळू शकते.

बँक शाखांमध्ये ही विशेष मोहीम ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहील. दावा प्रक्रिया सुलभ करण्यासाठी नागरिकांनी आपली ओळखपत्रे (आधार/ पॅन), बँक खात्याचे तपशील,मुदत ठेव प्रमाणपत्रे (असल्यास),आणि वारस असल्यास मृत्यू प्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र यासारखी संबंधित कागदपत्रे शिबिरांमध्ये सोबत आणावीत.पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली रक्कम परत मिळवावी,असे आवाहन श्री.कुमुद पंडा जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक,धाराशिव यांनी केले आहे.

## तुळजापुरात महाद्वार परिसरातील दुचाकींमुळे अडचण

तुळजापूर शुक्रवार पेठ रस्ता बेशिस्त दुचाकी पार्किंगने व्यापला आहे. त्यातून मार्ग काढणे भाविकांसह नागरिकांनाही त्रासदायक ठरत आहे. विशेष म्हणजे रस्त्यावर लावण्यात आलेल्या दुचाकी स्थानिकांच्या नसून, महाद्वार परिसरातील व्यावसायिकांचा असल्याने या दुचाकींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

राजमाता जिजाऊ महाद्वार पासूनच जवळच शुक्रवार पेठ रस्ता बेशिस्त दुचाकी पार्किंगने हरवून गेला आहे. रस्त्याचा मधोमध मोठ्या संख्येने दुचाकी लावण्यात येत असल्याने भाविकांसह नागरिकांना पायी चालताना त्रास सहन करावा लागत आहे. अस्ताव्यस्त पणे रस्त्यावर लावण्यात आलेल्या दुचाकी मुळे पादचाऱ्यांसाठी रस्ता शिल्लक नसल्याने या रस्त्यावर पायी चालणे मुश्किल झाले आहे. विशेष म्हणजे शेकडोंचा संख्येने लावण्यात आलेल्या दुचाकी महाद्वार परिसरातील व्यावसायिकांचा असल्याचे सांगण्यात येत असून रस्त्यावर बेशिस्तपणे लावण्यात आलेल्या दुचाकी वर कारवाई करण्याची मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे.

## मिलिंद आळणे, प्रा. डॉ. श्रीराम मुळीक यांना २३ वा आदर्श समाजभूषण, शिक्षण गौरव पुरस्कार प्रदान

### कोल्हापूरमध्ये राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५ सोहळा संपन्न !




कळंब(प्रतिनिधी)-कै. बसवंत नागू शिंगाडे सामाजिक सेवाभावी संस्था ट्रस्ट, बेळगाव महाराष्ट्र- कर्नाटक-गोवा यां तीन राज्याचा वतीने आयोजित राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५ हा भव्य आणि प्रेरणादायी पुरस्कार सोहळा कोल्हापूर येथे मोठ्या उत्साहात नुकताच पार पडला. समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, शिक्षण व वैचारिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा . डॉ. अमर कांबळे (अध्यक्ष, नालंदा विद्यापीठ, कोल्हापूर) हे होते. तर दीपप्रज्वलन मिस इंडिया शुभांगी शित्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यात मिलिंद आळणे, कळंब चे सुपुत्र प्रा.डॉ. श्रीराम मुळीक यांना त्यांच्या समाजोपयोगी, प्रेरणादायी व सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन आदर्श समाजभूषण, शिक्षण गौरव पुरस्कार (राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५) प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असून अनेक युवकांना प्रेरणा मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रकाश कदम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून समाजसेवेचे महत्त्व विशद केले. हा गौरव सोहळा कोल्हापूर येथे संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते दिव्यांगाना व्हिलचेअरचे वाटप

## सेरेंटीकाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी मोफत हेल्पलाईनचे उद्घाटन






धाराशिव, (प्रतिनिधी) - धाराशिव जिल्ह्याची आर्थिकदृष्ट्या मागास जिल्हा अशी ओळख आहे. जिल्ह्याची ही ओळख बदलण्यासाठी या भागाच्या आर्थिक विकासासाठी सेरेंटीका कंपनी काम करत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

सेरेंटीका कंपनीच्या वतीने जिल्ह्यातील ४० दिव्यांगाना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते व्हिलचेअरचे वाटप करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमासाठी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सेरेंटीका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसीडेंट सुरजीत नारायण, कर्नल विक्रम अय्यंगार, अमित चक्रोबोर्ती आदीची उपस्थिती होती.

येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार म्हणाले की, सेरेंटीका कंपनी जिल्ह्यातील दिव्यांग बंधू भगिनींना व्हिलचेअरचे वाटप करत आहे, तसेच जिल्ह्यातील दिव्यांगाना मदत करण्याची कंपनीची इच्छा आहे, ही मोठी गोष्ट आहे. जिल्ह्यातील विविध घटकांसाठी सेरेंटीका कंपनी काम करत आहे. युवक - युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम कंपनीच्या वतीने करण्यात येत असून हे कौशल्य प्रशिक्षण पुर्ण झालेल्या काही युवकांना नौकरी देण्याचे कामही कंपनीने केले आहे. जिल्ह्यातील दिव्यांग बंधू भगिनीही रोजगारक्षम व्हावे यासाठी कौशल्य प्रशिक्षण कंपनीच्या वतीने देण्यात यावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच सेरेंटिका कंपनीच्या वतीने करण्यात येणार्या विविध समाजपयोगी कामाची दखल घेवून कंपनीच्या वतीने करण्यात येणार्या या समाजपयोगी कामाचे कौतूकही जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी यावेळी केले.

*सेरेंटिका आपले प्रकल्प उभारताना, तेथील लोकांच्या सोयी सुविधांची काळजी घेत असते. गावांमध्ये नेमकी काय गरज आहे हे शोधून आम्ही तशी त्यांना मदत करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत असतो. गेल्या काही महिन्यात आम्ही अशा गरजू लोकांचा शोध घेतला ज्यांना चालण्या फिरण्याचा त्रास आहे. अशा लोकांचे जीवन सहज सोपे व्हावे यासाठी त्यांना व्हीलचेअर द्यावी असा एक संकल्प केला आणि तो संकल्प आज पूर्णत्वास आला आहे. याचा आम्हाला आनंद आहे. गावकर्यांच्या सोयी सुविधांसाठी सेरेंटिका नेहमीच प्रयत्नशील राहील असे सेरेन्टिका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजीत नारायण यावेळी म्हणाले. तसेच शेतकर्यांच्या हितासाठी सुरू करण्यात आलेली ही हेल्पलाईन प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांमध्ये पारदर्शकता, संवाद आणि विश्वास वाढविण्याचे माध्यम ठरेल. धाराशिव जिल्ह्यातील सर्व शेतकर्यांनी टोल-फ्री क्रमांक १८०० २०२ ८७३५ वर संपर्क साधून आपले प्रश्न, अडचणी किंवा माहिती नोंदविण्याचे आवाहन सेरेन्टिका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजीत नारायण यांनी केले.*

**सेरेंटीका कंपनीच्यावतीने शेतकऱ्यांठी हेल्पलाईन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उदघाटन**

सेरेंटीका कंपनीच्या पवनउर्जा प्रकल्प उभारताना शेतकर्यांचे पवनचक्की संबंधित समस्या सोडविण्यासाठी एक मोफत हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. १८०० २०२ ८७३५ हा कंपनीचा हेल्पलाईन नंबर असून याद्वारे शेतकर्यांना कंपनीच्या प्रतिनिधीशी थेट संवाद साधता येणार आहे. सदर हेल्पलाईन हि फक्त सेरेंटिकाच्या पवनऊर्जा प्रकल्प लाभार्थी शेतकर्यांसाठी असणार आहे. या हेल्पलाईनद्वारे सेरेन्टिका पवनचक्की संबंधित जमीन, वाटेचा वापर, नुकसान भरपाई, वाजवी मोबदला आणि इतर संबंधित समस्यासाठी शेतकर्यांना कंपनी बरोबर थेट संवाद साधता येणार आहे. शेतकर्यांना पवनचक्की प्रकल्पासंदर्भात असलेल्या शंकांचे निवारण होण्यास या हेल्पलाईनची मदत होणार आहे. सेरेन्टिका रिन्यूएबल्सच्या अधिकाऱ्यांकडून या हेल्पलाईनवर नोंदवलेल्या सर्व संबंधित तक्रारींवर आवश्यक ती कार्यवाही करून शेतकऱ्याना योग्य मार्गदर्शन व मदत केली जाईल. या हेल्पलाईनचे उदघाटनही बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सर्वांनाच नगरसेवक व्हावे वाटते..

महाराष्ट्रात अनेक वर्षांनी महानगरपालिकेची निवडणुक प्रक्रिया जाहिर झाली. त्यामुळे अनेक वर्षापासूनची नगरसेवक होण्याची ईच्छा पुर्ण करण्याचा योग आला आहे. पुर्वी दुरंगी लढत होत असत. आता तर तीन पक्षाची महायुती व महाआघाडीची निर्मिती झाली आहे. त्यात काही प्रादेशिक पक्षाची भर पडली आहे. अजून तरी पक्की अशी युती व आघाडीचे संकेत मिळत नाहीत. सत्तेत असणारे सुद्धा पक्ष एकत्र आले नाहीत मात्र तसा प्रयत्न सुरू आहे. त्याच प्रमाणे काँग्रेस व प्रकाश आंबेडकर एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहेत. ही सर्वात मोठी बाब चर्चिले जात आहे ती म्हणजे ठाकरे बंधु एकत्र येण्याची! ते एकत्र आले.वास्तविक महानगरपालिकेची निवडणुकीत उमेदवारी कोणाला मिळावी किंवा द्यावी या बाबत चर्चा होत असते. यात उतरणारे सर्वच चांगले किंवा वाईट नसतात. अनेक योग्य व्यक्ती उभा राहातात. मुळात राजकारण पुर्वीपेक्षा बदलते आहे. पुर्वी विरोध विचाराचा असला तरी त्याला उभा करून निवडूण आणत असत. अशा चांगल्या व्यक्तीची गरज विकास कामात लागते. चांगले व्यक्तींची गरज केंव्हाही पडू शकते. त्यामुळे चांगल्या व्यक्ती निवडूण आणत. पुर्वीचा खर्च व सध्याचा खर्चा बाबत विचार केला तर तफावत अधिक आहे. पुर्वी कार्यकर्ते घरच्या भाकरी घेऊन प्रचाराचे काम करीत होते आता तसे राहीले नाही. उलट झाले आहे. त्यापेक्षाही मोठी बाब निदर्शनास येते ती म्हणजे उभा राहाणारे कोण आहेत. एखादा गुन्हेगार सुद्धा लोकशाहीने मार्गाने निवडूण येतो. त्याच प्रमाणे अयोग्य व्यक्तीची शक्ती पाहुन त्याला चांगल्या पक्षात घेतले तर त्याच्यावरील कलंक धुऊन निघत आहेत. याला पर्याय ही काही नाही. प्रत्येकजन आता चांगले माणसे नगरसेवक व्हावीत असा विचार करीत आहे. तशी अपेक्षा करणे चुकीचे नाही. चांगली माणसे आणायाची कोठून. ते तर समोर येत नाहीत. दलदलित आडकण्याची तयारी नसते. बऱ्याच वेळा असेही होते की, चुकीचे माणसे नगरसेवक होत असतात मात्र ते लोकशाहीनुसार निवडले जातात. यामुळे दोष कोणाला द्यावयाचा! मुळात नगरसेवक पद असले तरी सेवेतून प्रतिष्ठा प्राप्त होते. यासाठी ही नगरसेवक होत असतात. सेवक होणे काही चुकीचे नाही मात्र जनतेनी योग्य व्यक्तीची निवड करणे अपेक्षित असते. चुकीचे व्यक्ती होऊ नये ही अपेक्षा असते. ज्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेत काम केले जाते त्यावेळी अनुभव आवश्यक असतो. त्यासाठी प्राथमिक काळापासून जनतेचे कामे करण्याची तयारी असावी लागते. जनतेची कामे न करणारी व एकदा निवडूण आले की, पुन्हा पाच वर्ष न फिरकणारी मंडळी बऱ्याच प्रमाणात दिसून येते. तरी ती दुसऱ्या टर्म साठी तयार दिसून येतात. त्यांना माहिती असते की, काय केल्याने पुन्हा विजयी होता येते. त्यानुसार ती पद्धत वापरून निवडूण येतात. मुळात पाच वर्षासाठी असणारे सेवक हे आपल्या भागात काम करणारी असली पाहिजेत. ज्यावेळी निवडूण येतात त्यावेळी त्यांच्यावर नगराची जबाबदारी येते. जडण-घडणेत हातभार लावावा लागतो. पाच वर्षासाठी जाणारी मंडळींसमोर अनेक वर्षापासून ठाम मांडून बसणारे अधिकारी-कर्मचारी असतात. त्यांना तोंड द्यावे लागते. तसे पाहिले तर महानगरपालिका असो किंवा नगरपरिषद असो किंवा ग्रामपंचायतीची निवडणुक असो यातील समस्या सारख्याच आहेत. समस्या मोठ्या नसतात. वेळेवर स्वच्छता, वेळेवर पाणीपुरवठा, विद्युतची सोय, रस्ते आदि. वास्तविक ही समस्याच नाहीत. एकदा का नियोजन केले तर केवळ देखभाल बाकी राहाते. वेळेवर भेटणे हे महत्त्वाचे असते. जनतेची कामे व्हावी०त असे नाही तर समाधान होणे अपेक्षित असते. त्यामुळे नगरसेवक होणे तसे आवघड नाही. केवळ यात चांगली माणसे निवडूण यावीत हा विचार समोर असला पाहिजे. राज्यात गुन्हेगार असोत किंवा अन्य गैरकारभारात आडकलेल्या मंडळींना डावलले पाहिजे. वरिष्ठ नेते मंडळींनी काही आचारसंहीता तयार केली पाहिजे की, कोणाला उमेदवारी द्यायची व कोणाला नको. सरसकट धनी व्यक्तीला उमेदवारी मिळते हा आता पर्यंतचा पायंडा पडला आहे. या विरोधात कोणी जात नाहीत. कोणत्या पक्षात गुन्हेगारी वृत्तीची व्यक्ती दिसून येत नाही? सर्वच पक्षात असली तरी अतिषय अयोग्य व्यक्तीला डावलेले पाहिजे. अजून जागा वाटपाचा प्रश्न सुटला नाही. त्याअगोदर युती किंवा आघाडीच निश्चित झाली नाही. सर्वांना स्वबळावर लढण्याची ईच्छा दिसून येत आहे. स्वबळावर लढलो अपयश आले तर महायुती किंवा महाविकास आघाडी ठरलेली आहे हे योग्य आहे का? स्वतंत्र लढयाचे व नंतर सत्तेसाठी एकत्र येणे हा एक प्रकारे जनतेचा विश्वास घात समजला पाहिजे. तसे होताना दिसून येत नाही. मुळात राजकारण हे समाजकारण समजले जात होते. आता समाजकारणातून राजकारण व तेथून अर्थकारणास सुरवात होते हे योग्य नाही. नुकतीच नगरपरिषदेची निवडणुक निकालावर नजर टाकली तर जनतेनी कौल कोणाच्या बाजून दिला. एक तर आलिकडील निवडणुका ह्या विकासावर होत आहेत. दुसऱ्या जातीवर होत आहे. विकासावर ठिक आहे मात्र जातीवर होत असतील तर योग्य नाही. त्यामुळे वरचेवर मतदारावर मोठी जबाबदारी येत आहे. जबाबदारपने निवडणे आवश्यक आहे. मत हे अमुल्य आहे ते योग्य व्यक्तीस दिले पाहिजे. योग्य व्यक्तीच निवडला पाहिजे. पाच वर्ष त्यांच्यासोबत विकास करावयाचा आहे. लोकशाहीने दिलेला अधिकाराचा वापर योग्य झाला पाहिजे. पुर्वी सारखे नाही. एक काळ असा होता की, दंडमशाही होती ती लोप पावली आहे. त्यामुळे मतदाराची जबाबदारी वाढली आहे. मतदारांनीच योग्य व्यक्तीची निवड केली पाहिजे. अधिकांश बिनविरोध निवड झाली पाहिजे. सर्वानुमत नगरसेवक निवडला पाहिजे. आपल्याच जवळचा गल्लीतील व्यक्ती असल्याने निवडूकीत संघर्षमय वातावरण निर्माण करण्यापेक्षा सर्वानुमत निवड करता आली पाहिजे. एक नवा पायंडा पाडण्याची गरज आहे. किती ही उमेदवार उभारले तरी एकाची निवड होते. त्यानुसार सर्वांनुमते, सर्व पसंतीनुसार एकाची निवड करणे ही मोठी जबाबदारी मतदार नागरिकांनी पार पाडली पाहिजे. सर्वांनाच नगरसेवक व्हावे वाटते. यात चुकीचे नसले तरी बिनविरोध निवड होणे काळाची गरज आहे. या बाबत विचार झाला पाहिजे. त्यामुळे अनेक चांगल्याबाबीची सुरवात होऊ शकेल.

# हिवाळ्यात रोज मेथीदाण्याचे पाणी पिल्याने काय होते? जाणून घ्या फायदे



प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात मेथीदाणे नक्कीच उपलब्ध असतात. कारण मेथीदाणे भाज्यांची चव वाढवतात. पण तुम्हाला माहिती आहे का की मेथीचे पाणी पिल्याने तुमच्या शरीराला अनेक फायदे होतात. हिवाळ्यात महिनाभर मेथीचे पाणी प्यायल्यास तुम्हाला कोणते फायदे होतील ते आपण जाणून घेऊया..

**पचनक्रिया सुधारते–**

मेथीदाण्याचे पाणी पिण्याचा पहिला फायदा तुमच्या पचनक्रियेसाठी होईल. कारण मेथीदाणे पोटाच्या समस्या कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे बद्धकोष्ठता, पोटफुगी, अपचन यांसारख्या समस्या दूर होतात.

**हंगामी आजार दूर राहतात–**

मेथीदाण्याचे पाणी पिल्याने सर्दी आणि फ्लूपासूनदेखील लगेच आराम मिळतो. कारण त्यात म्युसिलेज नावाचे एक संयुग असते, जे खोकला आणि सर्दी कमी करण्यास मदत करते. हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन होणारे आजारसुद्धा दूर होतात.

मधुमेहात फायदेशीर– मेथीदाण्याचे पाणी रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करते. ज्यामुळे मधुमेह नियंत्रित होण्यास मदत होते. म्हणूनच, ते मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर नेहमी नियंत्रित राहील.

**वजन कमी करण्यास मदत करते–**

मेथीचे पाणी वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी रामबाण उपाय आहे.कारण मेथीमधील फायबर शरीरातील चरबी कमी करण्यास देखील मदत करते. रोज सकाळी उपाशी पोटी मेथीच्या पाण्याचे सेवन केल्यास काही दिवसातच वजन कमी झालेले दिसून येईल.

**चमकदार त्वचा आणि केस–** मेथीचे पाणी नियमितपणे पिल्याने त्वचा आणि केस दोघांचीही गुणवत्ता सुधारते. त्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत होते. कोणत्याही महागड्या प्रॉडक्टसशिवाय चेहरा नितळ आणि सुंदर बनतो. तर दुसरीकडे केससुद्धा लांबलचक आणि चमकदार बनतात.

**किडनी निरोगी राहते–** मेथीचे पाणी आपल्या किडनीसाठी देखील खूप फायदेशीर आहे. कारण ते किडनीतील साचलेली घाण स्वच्छ करण्यास मदत करते. त्यामुळे किडनी निरोगी आणि स्वच्छ राहते. शिवाय किडनी स्टोनची समस्यादेखील मोठ्या प्रमाणात कमी करण्यास मदत होते.

# दिवसभर ऑफिसच्या कामाने थकवा आणि ताण येतो? फक्त १० मिनिटांच्या 'या' उपायाने मिळेल आराम

आजच्या धावपळीच्या जगात सकाळपासून संध्याकाळपर्यंत ऑफिसचे काम, मिटींग्स आणि सतत स्क्रीनकडे पाहणे यामुळे लोक मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या थकून जातात. ऑफिसमधून घरी आल्यानंतरही थकवा आणि चिडचिडपणा जाणवत असतो.

लोक सहसा असे गृहीत धरतात की या थकव्यासाठी फार काहीतरी करण्याची आवश्यकता असते. परंतु त्यासाठी फक्त १० मिनिटांचे छोटे बदल आणि उपाय केल्याने तुम्ही त्वरित आराम मिळवू शकता. आज आपण ऑफिसमधून परतल्यानंतर थकवा दूर करण्यासाठी काही सोपे आणि प्रभावी १० मिनिटांचे उपाय जाणून घेऊया..

**दीर्घ श्वासोच्छवासाचा सराव–**

जर तुम्हाला हा थकवा कमी वेळात दूर करायचा असेल, तर कामावरून घरी परतल्यानंतर थोडा वेळ शांत ठिकाणी बसा आणि दीर्घ श्वास घ्या. हळूहळू श्वास घ्या आणि श्वास सोडा. हा व्यायाम तुमचे मन शांत करतो आणि तणाव कमी करतो.

**चेहऱ्यावर थंड पाणी शिंपडा–**

तज्ञांच्या मते, थंड पाण्याने चेहरा धुणे किंवा हलकेच शिंपडल्याने दिवसभराचा थकवा लगेच कमी होतो. थंड पाण्याने चेहरा धुण्याने तुम्हाला ताजेतवाने आणि ताजेतवाने वाटते.

**स्ट्रेचिंग–**

ऑफिसमध्ये बराच वेळ एकाच जागी बसल्यावर तुमचे स्नायू कडक होतात. अशा परिस्थितीत, १० मिनिटे हलके स्ट्रेचिंग केल्याने तुमच्या शरीराला आराम मिळतो आणि रक्ताभिसरण सुधारते.

**डोळ्यांना आराम द्या–**

तुमच्या डोळ्यांना विश्रांती द्या. जेव्हा तुम्ही तुमच्या लॅपटॉपवर किंवा मोबाईल फोनवर बराच वेळ घालवता तेव्हा तुमचे डोळे थकू शकतात. डोळे बंद करा आणि २-३ मिनिटे हलका दाब द्या, किंवा थंड कापड वापरा. यामुळे डोळ्यांचा थकवा लगेच कमी होईल.

**म्युझिक ऐका–**

तज्ञांच्या मते, थकवा दूर करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे शांत आणि लयबद्ध म्युझिक ऐकणे. अशा प्रकारचे म्युझिक ऐकल्याने तुमचा ताण कमी होतो आणि तुमचा मूड सुधारतो.

# डोळ्यांसाठी फायदेशीर आहेत 'हे' आयुर्वेदिक उपाय, दृष्टी सुधारते कमी होतो मोतीबिंदूसारख्या आजारांचा धोका

अलीकडे सकाळी उठल्याबरोबर मोबाईल वापरणे, नंतर दिवसभर लॅपटॉप आणि नंतर रात्री पुन्हा टीव्ही किंवा फोन वापरणे यामुळे डोळे कमकुवत होत आहेत. शिवाय, प्रदूषणात असलेले कण देखील आपल्या डोळ्यांना हानी पोहोचवत आहेत. यामुळेच अनेक लोकांचे डोळे वयाच्या आधी कमकुवत होत आहेत किंवा त्यांना डोळ्यांशी संबंधित काही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.



आज आम्ही तुम्हाला कमकुवत दृष्टीवर उपचार करण्याचा एक पूर्णपणे नैसर्गिक मार्ग सांगणार आहोत. अशा पाच औषधी वनस्पतींबद्दल जाणून घेऊया, ज्यांचे सेवन प्रत्येकजण करू शकतो. याचा अर्थ असा की कमकुवत डोळे असलेले कोणीही, तरुण असो वा वृद्ध, या औषधी वनस्पतींचा त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत समावेश करू शकतात. या औषधी वनस्पतींबद्दल जाणून घेऊया..

आवळा–

आवळ्याच्या औषधी गुणधर्मांबद्दल सर्वांनाच माहिती आहे. व्हिटॅमिन सीने समृद्ध आवळा दररोज खाल्ल्याने तुमचे आरोग्य आणि त्वचा दोन्ही सुधारू शकते. पण आवळा डोळ्यांसाठी देखील अविश्वसनीयपणे फायदेशीर आहे. व्हिटॅमिन सी रेटिनाचे नुकसान होण्यापासून संरक्षण करते, ते निरोगी ठेवते. तसेच दृष्टी राखण्यास देखील मदत करते आणि मोतीबिंदूसारख्या आजारांचा धोका कमी करते.

त्रिफळा–

त्रिफळा हे आवळा, हिरडा आणि बहेडा या फळांचे मिश्रण आहे. याचा अर्थ असा की त्याचे सेवन केल्याने केवळ एकच नाही तर तीन औषधी वनस्पतींचे फायदे मिळतात. या वनस्पती फक्त पोटाच्या समस्यांवर उपचार करण्यासाठी फायदेशीर नाही तर डोळ्यांच्या समस्यांवर रामबाण उपाय म्हणून देखील काम करते.

गुलाबजल–

डोळे स्वच्छ करण्यासाठी गुलाबजलचा वापर प्राचीन काळापासून केला जात आहे. ते डोळ्यांसाठी आरामदायी टॉनिक म्हणून काम करते. जर तुम्हाला अंधुक दृष्टी, कर्कशपणा, थकवा, जळजळ आणि लालसरपणा यासारख्या समस्या येऊ लागल्या असतील, तर गुलाबजलचा थंडावा दीर्घकाळ स्क्रीनवर बसल्यामुळे होणारा थकवा, जळजळ किंवा लालसरपणा त्वरित दूर करू शकतो. ते डोळ्यांना मॉइश्चरायझ करते आणि शांत करते.

# हिवाळ्यात केसांत कोंडा का होतो? 'या' आयुर्वेदिक उपायाने दूर होईल समस्या

आयुर्वेदात प्रत्येक शारीरिक समस्येवर उपाय आहेत. त्याप्रमाणेच केसांच्या समस्यांवर देखील उपाय सांगण्यात आले आहेत. आहारापासून ते विविध प्रॉडक्टसपर्यंत, केसांसाठी अनेक फायदेशीर पद्धती आहेत. केसांची एक प्रमुख समस्या म्हणजे डोक्यातील कोंडा. टाळूची दीर्घकाळ स्वच्छता न केल्याने घाण साचते. याव्यतिरिक्त, टाळूचा कोरडेपणा किंवा संसर्ग वाढल्यानेदेखील डोक्यात कोंडा होऊ शकतो. आयुर्वेदात डोक्यातील कोंडा दूर करण्यास मदत करणारे अनेक उपाय आहेत. आज आपण अशाच एका उपायाबाबत जाणून घेऊया.



केसांमध्ये कोंडा का होतो?

हिवाळ्यात कोंडा होण्याचे मुख्य कारण म्हणजे टाळूच्या पेशी आणि केसांमधून बाहेर पडणारे तेल जमा होणे. कधीकधी, टाळूवर इतके तेल जमा होते की संपूर्ण डोक्यावर पांढरा थर तयार होतो. यामुळे टाळूमध्ये खाज सुटणे, जळजळ होणे आणि तीव्र वेदना देखील होऊ शकतात.

केसांतील कोंड्यासाठी आयुर्वेदिक उपाय–

साहित्य–

आंब्याच्या कोयची पावडर १० ग्रॅम
त्रिफळा पावडर १० ग्रॅम
पाणी ५०० मिली
ताक ५०० मिली

बनवण्याची पद्धत–

सर्वप्रथम एका पॅनमध्ये ५०० मिली पाणी गरम करा. गरम पाण्यात त्रिफळा पावडर आणि आंब्याच्या कोयची पावडर घाला आणि मिक्स करा. हे सर्व साहित्य चांगले उकळवा आणि घट्ट होईपर्यंत शिजवा. काढायसारखं थोडं घट्ट झाल्यावर ते एका भांड्यात काढा आणि थोडे थंड होऊ द्या. हे मिश्रण कोमट झाल्यावर, त्यात ५०० मिली ताक घाला. या मिश्रणाने केसांना चांगले मसाज करा आणि ते धुवा.

लक्षात ठेवा, कोंडा दूर करण्यासाठी हा उपाय केल्यानंतर कोणताही शॅम्पू किंवा कंडिशनर वापरू नका. कोंडा दूर करण्यासाठी हा आयुर्वेदिक उपाय आठवड्यातून २ ते ३ वेळा केल्याने फायदा मिळेल.

# प्रेमळ व हळव्या मनाचे साने गुरुजी

भारतीय स्वतंत्र चळवळीतील स्वातंत्र्य सेनानी कवी, लेखक, समाजातील अस्पृश्यता निर्मूलन करणारे समाजवादी नेते श्री. साने गुरुजी म्हणजेच पांडुरंग सदाशिव साने यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली जवळील पालगड या गावात झाला. त्यांच्या आईचे नाव यशोदाबाई तर वडिलांचे नाव सदाशिव असे होते.

पांडुरंग यांचे वडील ब्रिटिशांकडे महसूल गोळा करण्याचे काम करत असत. ते सरकारच्या वतीने गावातील पिकांचे मूल्यमापन व संकलन करीत असत. पांडुरंग यांच्या बालपणातील सुरवातीचे दिवस चांगले गेले. परंतु नंतर त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची होत चालली. अशा परिस्थितीत पांडुरंगाच्या आईचे निधन झाले. त्यांच्या आईला वेळेवर औषध पाणी न मिळाल्यामुळे व ती मरताना तिला न भेटता आल्यामुळे पांडुरंग खूप दु:खी झाले होते.

पांडुरंगाचे प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा या गावात झाले. प्राथमिक शिक्षणानंतर त्याला पुढील शिक्षणासाठी त्याच्या मामा सोबत पुण्याला पाठविण्यात आले. परंतु त्याला पुण्याला राहणे आवडले नाही. म्हणून तो पालगड पासून सहा मैलावर असलेल्या मिशनरी शाळेत गेला. दापोली मध्ये असताना पांडुरंगाने मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळविले. त्याला कविता करण्याची खूप आवड होती.

दापोली येथे असताना त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती खूपच खालवली आणि तो शिक्षण सुरू ठेवू शकला नाही. त्यामुळे त्याने नोकरी करण्याचे ठरविले. परंतु त्याला शिक्षणाची खूप आवड असल्यामुळे त्याने औंध येथील संस्थेच्या शाळेत प्रवेश घेतला. ती संस्था गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि जेवण पुरवीत असे. औंध येथे पांडुरंगाने खूपच त्रास सहन केला, परंतु शिक्षण सोडले नाही.

त्यानंतर पांडुरंग पुण्याला आला व नूतन मराठी विद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्याने अनेक कष्ट सहन केले. परंतु शाळा शिकण्याची जिद्द सोडली नाही आणि १९१८ मध्ये तो मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. हायस्कूलनंतर पांडुरंगाने न्यू पुना कॉलेज म्हणजेच आताचे सर परशुराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे त्याने मराठी आणि संस्कृत मध्ये बी.ए. आणि एम.ए. ची पदवी मिळविली.

पुढे पांडुरंगाने अमळनेर शहरातील प्रताप हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. तिथे पांडुरंगाला साने गुरुजी म्हणून ओळख मिळाली. साने गुरुजी एक प्रतिभावंत वक्ते होते. नागरी हक्क आणि न्याय यावरील त्यांच्या भाषणामुळे अनेक विद्यार्थी त्यांच्याकडे आकर्षित झाले. शाळेत असताना त्यांनी विद्यार्थी नावाचे मासिक प्रकाशित केले. ते शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये खूप लोकप्रिय झाले. साने गुरुजींनी हा अध्यापनाचा व्यवसाय फक्त सहा वर्ष चालविला. त्यानंतर त्यांनी आपले जीवन भारतीय स्वातंर्त्य लढ्यासाठी समर्पित करण्याचे ठरविले.

१९३० मध्ये महात्मा गांधींनी दांडी मोर्चा सुरू केला. तेव्हा साने गुरुजींनी त्यामध्ये सहभाग घेण्यासाठी आपल्या शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा दिला. सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. त्याबद्दल इंग्रजांनी साने गुरुजींना धुळे येथील तुरुंगात १५ महिन्याची शिक्षा भोगण्यासाठी पाठवले. १९३२ मध्ये विनोबा भावे व साने गुरुजी एकत्रित शिक्षा भोगत होते. तेथे विनोबा भावे दर रविवारी सकाळी भगवद्गीतेवर व्याख्यान देत असत.

१९३० ते १९४७ या काळात साने गुरुजींनी वेगवेगळ्या आंदोलनामध्ये सहभाग घेतला आणि त्यांना आठ वेळा अटक करण्यात आले. त्यामध्ये धुळे, त्रिचनापल्ली, नाशिक, येरवडा आणि जळगाव या ठिकाणी ठेवण्यात आले होते. या काळात साने गुरुजींनी सातवेळा उपोषण केले. साने गुरुजींना दुसऱ्यांदा त्रिचनापल्ली येथे तुरुंगात टाकले. तिथे त्यांनी तामिळ आणि बंगाली भाषा शिकून घेतल्या. तेथे त्यांनी कुरालच्या प्राचीन तामिळ नैतिक कार्याचे मराठीत भाषांतर केले. त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात आंतरभारतीय चळवळ सुरू केली. ग्रामीण महाराष्ट्रात विशेषत: खानदेशात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उपस्थितीत प्रसार करण्यास साने गुरुजींनी महत्त्वाची भूमिका बजावली. ते फैजपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनाच्या संघटनेत सक्रिय सहभागी होते. १९३६ च्या मुंबई प्रांतीय निवडणुकीच्या मोहिमेत त्यांनी भाग घेतला होता. १९४२ च्या भारत छोडो या चळवळीमध्ये ही त्यांनी सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना अटक झाली होती व पुढे पंधरा महिन्याची शिक्षा पण त्यांना झाली होती. या चळवळीमध्ये शिक्षा भोगत असताना मधु लिमये या सारख्या काँग्रेस समाजवादी नेत्यांची त्यांना साथ मिळाली.

१९४७ मध्ये सुमारे चार महिने संपूर्ण महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी आंदोलन केले. या दौऱ्यात मे महिन्यात अस्पृश्यांसाठी विठ्ठल मंदिर खुले करण्यासाठी पंढरपूर येथे साने गुरुजी आले.१ मे ते ११ मे १९४७ पर्यत ११ दिवस हे उपोषण चालले आणि अखेर विठ्ठल मंदिराचे दरवाजे अस्पृश्यांसाठी उघडण्यात आले.

भारताला स्वातंर्त्य मिळाले व त्यानंतर पाच महिन्यांनी महात्मा गांधींची हत्या झाली. या घटनेचा साने गुरुजींच्या मनावर खोल परिणाम झाला या दुर्घटनेनंतर साने गुरुजींनी २१ दिवस उपोषण केले. त्यांच्या मनाला या घटनेचा इतका अवाक्याबाहेर भयानक परिणाम झाला की, त्यांना आपणही मरावे असे वाटू लागले. त्यातच त्यांनी ११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्याचे अति सेवन करून आत्महत्या केली.साने गुरुजी नेहमी म्हणत असत. मुले ही देवा घरची फुले आहेत. आजची मुले ही उद्याच्या स्वतंत्र भारताचे नागरिक आहेत. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हे त्यांचे देशभक्तीपर गीत त्याकाळी खूपच लोकप्रिय होते व आजही ते तितकेच लोकप्रिय आहे. आजही प्रत्येक शाळेमध्ये हे गीत गायले जात आहे. असे हे मायाळू, प्रेमळ, सात्विक असे साने गुरुजी आज आपल्याच नाहीत. याचे दु:ख आज आम्हाला होत आहे. सर्वांना समानतेची शिकवण देणारे साने गुरुजी यांना आमचे शतश: प्रणाम !!!.

**– अनिल जाधव, बार्शी**

# आनंद शोधायचा नसतो अनुभवायचा असतो

आनंद हा शोधायचा विषय नाही तू जगायचा अनुभव आहे तरी ही आपण त्याला सतत अटी शर्तीच्या चौकटीत अडकवत असतो हे मिळाले तर आनंद ते साध्य झाले तर समाधान अशा आसा अपेक्षेच्या ओझ्याखाली आनंद हलकासा होत जातो प्रत्यक्षात आनंद कुठेही बाहेर नाही तो आपल्या मनाच्या दारातच उभा असतो फक्त उघडायला आपण तयार असायला हवं लहान मुलाच्या हसण्यात हा आनंद निखळपणे दिसतो त्या ना फार काही लागत नाही. एखादी गोष्ट एखादा खेळ एखादा प्रेमळ शब्द आणि चेहऱ्यावर उमटे निर्मळ हास्य त्या हास्य त स्पर्धा असते ना तुलना मला त्या हशात केवळ जगण्याची उत्स्युकता आपण मोठे होताना हे साधेपणा हरवतो जबाबदाऱ्या वाढतात अपेक्षा वाढतात आणि आनंदासाठी ही अटीही वाढते आनंदाची खरी व्याख्या मोठे यश येत नाही तर छोट्या क्षणात दडलेले असते सकाळचे कोवळी हवा चहाचा पहिला घोट ओळखीचा आवाज मनापासून केलेले कौतुक हे सारे क्षण आपल्याला हसायला पुरेशी असतात पण आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करतो कारण आपण आनंदाला नेहमीच मोठे असायलाच हवी असे गृहीत धरतो आपण आनंद कठीण करतो कारण आपण सतत तुलना करतो इतर कडे काय आहे आपल्याकडे काय नाही या गणितात समाधान हरवतो तुलना थांबली की स्वीकार सुरू होतो . स्वीकाराला की शांतता येते आणि शांततेत तूनच आनंद उमलतो आज गरज आहे ते आनंद साधा करण्याची अपेक्षा कमी करण्याची क्षणांना महत्त्व देण्याची आणि मन हलकं ठेवण्याची कारण आनंद हा ध्येय नसून प्रवास आहे तो रोजच्या पावलात सापडतो फक्त पाहायची नजर हवी आणि मन उघडे ठेवायचे धीर्य आनंद कठीण नाही आपणच तो कठीण करून ठेवतो तो पुन्हा सोपा करूया मुलासारखे निर्मळ मनमोकळे करूया

**लेखक–रामेश्वर डोंगरे**
**लातूर समाचार धाराशिव**

# कौल कोणाला?



पैशाचा मोठ्या प्रमाणावर वापर हा अलीकडे निवडणुकीचा अविभाज्य भाग झाला आहे; पण पराभवासाठी तेच कारण विरोधी पक्ष सांगत बसले तर त्यांना उभारी मिळण्याची शक्यता कमी.

राज्यातील नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष होते. भारतीय जनता पक्षाने आपले वर्चस्व कायम असल्याचे या निकालातून दाखवून दिले आहे. विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवून महायुती सत्तेत आली. यानंतर वर्ष उलटल्यावर देखील जनमताचा कौल फारसा बदललेला नाही, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले. विरोधी पक्षांसाठी हा धडा आहे; पण अद्याप ते आत्मपरीक्षण करायला तयार आहेत, असे दिसत नाही ! मग, महापालिकांचे आव्हान ते कसे पेलणार? हा प्रश्न निर्माण होतो! महापालिकेसाठी इच्छुकांची गर्दी भाजप अथवा महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याकडेच दिसत आहे. विशेषतः भाजपमध्ये अन्य पक्षांमधून भरती सुरू आहे. महायुतीमधील आपल्या मित्र पक्षांची पर्वा न करता धडाक्यात सुरू असलेली ही आयात शिंदे यांची शिव-सेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांना अस्वस्थ करणारी असली तरी भाजपने आक्रमक धोरण कायम ठेवले. आता नगरपालिका आणि नगर पंचायत यांच्या निवडणुकीतील विजयामुळे ते धोरण कायम राहणार, यात संशय दिसत नाही. नगराध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होती. २८८ पैकी २२५ नगराध्यक्ष महायुतीचे आहेत! यातही १२५ च्या आसपास नगराध्यक्ष केवळ भाजपचे आहेत. भाजपचे तीन हजाराहून अधिक नगरसेवक निवडून आले. बहुतेक ठिकाणी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सामना झाला आणि तरीही सत्तारूढ महायुतीमधील याच पक्षांना गावगाड्यासाठी महाराष्ट्रातील मतदारांनी संधी दिली.

**समतोल साधला**

महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा प्रचार मुळातच जोर धरू शकला नाही. प्रमुख नेते प्रचारात हिरिरीने उतरले, असे दिसले नाही. त्यांनी स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांवर ही निवडणूक सोडून दिली होती असे म्हटले तरी चालेल ! त्याउलट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी जोरदार प्रचार केला. राज्यातील सत्तेत एकत्र, पण स्थानिक पातळीवर विरोधात, असे बर्याच ठिकाणी असतानाही मित्र पक्षांमध्ये कटुता वाढणार नाही, हे पाहिले गेले. तो समतोल महायुतीला साधता आल्याने मतदारांमध्ये नकारात्मक संदेश गेला नाही. महापालिकांच्या जागावाटपामध्ये महायुतीला याचा उपयोग होणार आहे. २०१७ नंतर या निवडणुका झाल्या. दीर्घकाळ लोकप्रतिनिधींच्या हाती स्थानिक कारभाराची सूत्रे नव्हती. २०१७ च्या तुलनेत भाजपला दुप्पट यश मिळाले. राज्यातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष, हे स्थान जागावाटपाच्या सूत्रात आताच त्या पक्षाची बाजू वरचढ करणारे म्हणता येईल. चंद्रपुरात भाजपचा पराभव झाला. पक्षाचे ज्येष्ठ आणि नाराज नेते सुधीर मुनगंटीवार यांनी पराभवाचे खापर पक्षनेतृत्वावर फोडून आपल्या राजकीय पीछेहाटीला आणखी बळ दिले! पुणे जिल्ह्यात अजित पवार यांनी आपला वरचष्मा कायम असल्याचे सिद्ध केले. पुण्यात एकाही ठिकाणी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्ष आणि उद्धव यांची शिवसेना यांचा नगराध्यक्ष होऊ शकला नाही. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, राज्यातील मंत्री नितेश राणे, आदिती तटकरे, जयकुमार गोरे, गुलाबराव पाटील, गिरीश महाजन, जयकुमार रावळ, बाबासाहेब पाटील वगैरेंना आपापल्या प्रभावक्षेत्रात चमकदार कामगिरी करता आली नाही. कणकवलीत निलेश राणे आणि त्यांचे बंधू नितेश राणे यांच्यातील संघर्ष हा चर्चेचा विषय बनला होता. कणकवली आणि मालवणमध्ये शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष निवडून आणत निलेश राणे यांनी मंत्री नितेश यांना धक्का दिला आहे. कोकणात एकनाथ शिंदे यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. आता सर्व राजकीय पक्षांसाठी आगामी २९ महापालिकांची निवडणूक महत्त्वाची आहे. विशेषतः मुंबई महापालिकेकडे केवळ राज्याचेच नव्हे, तर देशाचे लक्ष लागलेले आहे. जे मुद्दे सर्वसामान्य नागरिकांच्या रोजच्या जीवनाला स्पर्श करणारे ना-हीत, त्यांना जिव्हाळ्याचे वाटणारे नाहीत, तेच घेऊन विरोधक महापालिका निवडणुकीला सामोरे जाणार का? सत्ताधार्यांच्या सामर्थ्याचे आकलन करून व्यूहरचना आखली नाही, तर महापालिका निवडणूक निकालात नगरपालिका आणि नगरपरिषदेच्याच निकालांची पुनरावृत्ती झाल्याशिवाय राहणार नाही.

# हिवाळ्यात तुमची त्वचा चमकदार करण्यासाठी

हिवाळ्यातील त्वचेची काळजी घ्यावी लागते. कारण थंड वारे आणि कोरडे हवामान त्वचा कोरडी आणि निर्जीव बनवू शकते. त्वचा, विशेषतः शरीरावर आणि चेहऱ्यावर, ओलावा कमी होऊ लागते, ज्यामुळे ती कोरडी, खडबडीत आणि थोडीशी चिडचिड होते.

हिवाळ्यात त्वचेची आवश्यक ओलावा राखणे आणि ती हायड्रेट ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी महागड्या उत्पादनांची आवश्यकता नाही.

दोन सोप्या घरगुती घटकांनी तुमची त्वचा मऊ आणि चमकदार बनवू शकता. कसे काय जाणून घेऊ या.

मेकअप टूल्स आपल्याकडे ठेवावे

क्रीम आणि मध

हिवाळ्यात त्वचेची आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी क्रीम आणि मधाचे मिश्रण एक प्रभावी मार्ग असू शकते. क्रीममधील फॅटी ॲसिड आणि मधाचे मॉइश्चरायझिंग गुणधर्म तुमच्या त्वचेला केवळ हायड्रेट करत नाहीत तर ती मऊ आणि चमकदार देखील ठेवतात.

चरीरींहळ

कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांच्यावर न्यायालयाने मोठी कारवाई केली, अजामीनपात्र वॉरंट जारी

ठशरव ीश

क्रीममधील लॅक्टिक ॲसिड त्वचेला एक्सफोलिएट करते, ज्यामुळे ती मऊ आणि निरोगी दिसते. मधामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचेला पोषण देतात आणि ती मॉइश्चरायझ ठेवतात.

डाग रहित चमकदार मऊ त्वचा मिळवा

कसे वापरायचे

एका भांड्यात १चमचा ताजी दुधाची क्रीम आणि १ चमचा मध घालून चांगले मिसळा.

हे मिश्रण चेहरा आणि शरीराच्या त्वचेवर चांगले लावा आणि १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या.

नंतर कोमट पाण्याने धुवा.

आठवड्यातून २-३ वेळा हा उपाय वापरल्याने तुमची त्वचा हिवाळ्यातही मऊ आणि चमकदार राहील.

ऑलिव्ह ऑइल आणि लिंबू मिश्रण

जर तुम्ही या हिवाळ्यात तुमच्या त्वचेला खोलवर मॉइश्चरायझ करू इच्छित असाल तर ऑलिव्ह ऑइल वा-परणे हा सर्वोत्तम उपाय आहे. ऑलिव्ह ऑइल त्वचेला हायड्रेट करते आणि लिंबूमधील व्हिटॅमिन सी त्वचेचा रंग सुधारते.

हे मिश्रण लावण्याचे अनेक फायदे आ-हेत. ऑलिव्ह ऑइल ओलावा टिकवून ठेवते, कोरडेपणा टाळते. लिंबाचा रस मृत त्वचेच्या पेशी काढून टाकतो आणि चमक वाढवतो. आवळ्या फेस पॅकने मिळवा चमकदार आणि तेजस्वी त्वचा कसे बनवायचे जाणून घ्या

कसे वापरायचे

१ चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये २-३ थेंब लिंबाचा रस मिसळा.

हे मिश्रण चेहऱ्यावर आणि शरीरावर व्यवस्थित लावा आणि हलक्या हाताने मसाज करा.

ते १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या आणि नंतर कोमट पाण्याने धुवा.



अस्वीकरण (ऊळी-लश्ररळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत वेबदुनिया कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला

# घाईघाईने खाण्यामुळे आरोग्याला धोका होऊ शकतो, कसे काय जाणून घ्या

चांगल्या आरोग्यासाठी

खाण्याच्या चांगल्या सवयी असणे आवश्यक आहे. या धावपळीच्या जीवनात स्वतःसाठी वेळ काढणे सोपे नाही. बऱ्याचदा वेळेअभावी आपण घाईघाईने अन्न खातो, ज्याचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. जर अन्न योग्य पद्धतीने घेतले नाही तर समस्या वाढू शकते. चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे पोटात गॅसची समस्या त्रासदायक असते, यासाठी चांगले उपचार आवश्यक आहेत.

पोटात गॅस तयार होण्याची समस्या गंभीर आहे आणि त्याकडे दुर्लक्ष करू नये. हे पचनाच्या समस्या किंवा चुकीच्या जीवनशैलीचे लक्षण असू शकते. जर जेवणादरम्यान अन्न योग्यरित्या पचले नाही तर आतड्यांमध्ये किण्वन होऊन कार्बन डायऑक्साइड, हायड्रोजन आणि मिथेन सारखे वायू तयार होतात, ज्यामुळे पोट फुगणे, जडपणा आणि वेदना होतात.

कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांच्यावर न्यायालयाने मोठी कारवाई केली, अजामीनपात्र वॉरंट जारी

पोटात वायू तयार होण्यास अनेक घटक जबाबदार आहेत. मुख्य कारणांमध्ये तेलकट, मसालेदार आणि जलद पदार्थांचे जास्त सेवन; चघळल्याशिवाय घाईघाईने खाणे, ज्यामुळे हवा गिळण्यास भाग पाडले जाते; आणि

आयुर्वेदानुसार, कमकुवत पचनशक्ती (जठराग्नी), ताण, चिंता आणि अनियमित दैनंदिन दिनचर्या यांचा समावेश आहे. डाळी, सोडा पेये आणि रात्री उशिरा झोपणे ही देखील प्रमुख कारणे आहेत.

आयुर्वेदात गॅसपासून आराम मिळण्यासाठी अनेक उपाय सांगितले आहेत. गॅसपासून तात्काळ आराम मिळण्यासाठी कोमट पाण्यासोबत सेलेरी आणि काळे मीठ घ्या. पचन सुधारण्यासाठी आल्याचा तुकडा चावा. गॅसपासून आराम मिळण्यासाठी जेवणानंतर



बडीशेप चावा किंवा पाणी प्या. हिंग पाण्यात विरघळवून प्या किंवा पोटावर चोळा. कोमट पाण्यात लिंबू घालून प्या. बद्धकोष्ठता आणि गॅस

कमी करण्यासाठी

झोपण्यापूर्वी त्रिफळा पावडर घ्या

शरीरात ऑक्सिजनची पातळी कमी होणे धोकादायक ठरू शकते, हे घरगुती उपाय करा

योगा करा

आयुर्वेदात योग्य जीवनशैली किंवा दैनंदिन दिनचर्या हे शंभर समस्यांवर उपाय म्हणून वर्णन केले आहे. वेळेवर अन्न खा, हळूहळू चावणे, जेवणानंतर झोपणे टाळणे, फिरणे आणि पवनमुक्तासन आणि वज्रासन सारखे योगासन आणि प्राणायाम करणे. ताण कमी करा. विशेष म्हणजे, ही समस्या झोपेच्या कमतरतेमुळे देखील होते. आयुर्वेदात याला पोट फुगणे म्हणतात. सततच्या समस्या यकृत आणि स्वादुपिंडावर परिणाम करू शकतात. हे मुलांमध्ये आणि वृद्धांमध्ये अधिक सामान्य आहे. मेथीचे पाणी, पेपरमिंट तेल आणि पोटाची मालिश देखील उपयुक्त ठरू शकते. संतुलित आहार, निरोगी खाण्याच्या सवयी आणि घरगुती उपायांनी हे सहजपणे व्यवस्थापित केले जाऊ शकते. तथापि, कोणतेही औषध घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स



सध्या हॉट योग, योगालेट्स, योग एरोबिक्स, कॅन्डलेलिट योग यांसारखे नवनवीन योगप्रकारांचा ट्रेंड अलीकडच्या काळात पाहायला मिळत आहे. पिलेट्ससारखे योगप्रकार हे पाठ आणि पोटाच्या स्नायूंसाठी अतिशय उपयुक्त मानले जातात.

नव्या ट्रेंडनुसार कार्यात्मक प्रशिक्षण आणि पिलेट्स यांना एकत्रित करण्यात आलं आहे. ज्यामुळे शरीराचा तोल सांभाळण्यासाठी आवश्यक असलेला समन्वय साधण्यास मदत होते. या व्यायामप्रकारात बोसू बॉल, वोबल बोर्ड्स आणि जिम बॉल्स यांची मदत घेतली जाते.

**फायदे**

० कंबरेसाठी उपयुक्त.
० रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुरळीत पार पडते.

ॲक्वा एरोबिक्स

ॲक्वा एरोबिक्स या व्यायामप्रकारात देखील नवीन ट्रेंड्स पाहायला मिळतात, ज्यात फ्लोट्स आणि पॅडल सोबतच नवीन व्यायाम साधनांची मदत घेतली जाते.




## विनोद

दोन मित्र खूप दिवसांनी एकत्र भेटले. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. 'तुझी बायको स्वभावाला कशी आहे रे?' पहिल्याने विचारले. 'खूप चांगली आहे' दुसरा म्हणाला. 'वा!... ऐकून बरं वाटलं!' 'तुझी रे!...' 'माझी बायको तर रोज माझी पूजा करते.' 'काय म्हणत-ेस?' 'हो. रोज एकदा तरी माझ्यापुढे हात नाचवून ती म्हणते आता दिवे ओवाळू का तुम्हाला?'

## संदेश

Madam danda leke class me aayi

Madam – madam me sapne me japan pahuch gyi thi

Madam – Billu tu kaha tha kal ?

Billu – Madam me pinki ko airport pe chorne gaya tha.

## सुविचार



तेजस्वी नावामुळे गीताला पावित्र्य येते.
– बायरन विज्ञानविश्व

**संस्कृत सुभाषित**

न विषादे मन: कार्य विषादो बलवत्तर:।
विषादो इान्ति पुरुषं बालं क्रुद्ध इव-ेरग:।।

अर्थ : मनात कधी विषाद आणू नये, हा विषाद फार बलवत्तर असतो जणू एखादा विषारी सर्प असावा, तसा हा विषाद असतो व तो बालांचा-पुरुषांचा नाश करतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दृष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

## उभे शब्द

१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

## आडवे उत्तरे

१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

## उभे उत्तरे

१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोराकरकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार




## थोडक्यात/ संक्षिप्त

### हटमॅनचे विजय हजारेमध्ये मझटपट पटापटफशतक, ६२ चेंडूत शतकी खेळी

**नवी दिल्ली:**विजय हजारे ट्रॉफीमध्ये रोहित शर्माने वादळी खेळी करत शतक झळकावलं आहे. विजय हजारे ट्रॉफीत मुंबईचा सामना सिक्कीम संघाविरूद्ध खेळवला जात आहे. २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा सलामीला उतरला आणि त्याने शतकी खेळी करत संघाला उत्कृष्ट सुरूवात करून दिली. रोहित शर्मा ७ वर्षांनंतर विजय हजारे स्पर्धा खेळण्यासाठी उतरला आहे.

जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियममध्ये रोहित शर्मा फलंदाजीला उतरला आणि त्याने दुसऱ्याच चेंडूवर शानदार षटकार खेचत आपले मनसुबे जाहीर केले. रोहितचा सामना पाहण्यासाठी १२ हजारहून अधिक लोक उपस्थित होते आणि रोहित शर्माने आपल्या फलंदाजीने चाहत्यांना निराश केलं नाही. २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहितने मुंबईला धमाकेदार सुरुवात करून दिली. त्याने अंगक्रिश रघुवंशीबरोबर मिळून डावाला गती दिली. रोहितने पॉवरप्लेमध्ये चार षटकार आणि सात चौकार लगावले.

रोहित शर्माचं शानदार शतक-रोहितने २८ चेंडूत ५४ धावा करत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यामध्ये ५२ धावा त्याने चौकार-षटकारांच्या मदतीने केल्या. त्यानंतर रोहितने गियर बदलत पुढच्या ३५ चेंडूत शतक पूर्ण केलं. रोहितने ६२ चेंडूत ८ चौकार व ८ षटकारांच्या मदतीने १०० धावा शतकी खेळी साकारली. रोहित शर्माने लिस्ट ए क्रिकेटमधील ३८वं शतक झळकावलं आहे.वनडेमधील जगातील नंबर वन फलंदाज असलेल्या रोहित शर्माने विजय हजारे ट्रॉफीत न्यूझीलंडविरूद्ध मालिकेची तयारी केली.

### ३२ चेंडूत शतक! कर्णधाराची लिस्ट ए मधील सर्वात जलद शतकी खेळी,

पटणा-विजय हजारे ट्रॉफीमधील बिहार आणि अरूणाचल प्रदेश यांच्यातील सामन्यात धावांचा पाऊस पडला. आधी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने ३६ चेंडूत शतक झळकावत संघाला शानदार सुरूवात करून दिली. यानंतर सूर्यवंशी १९० धावा करत बाद झाला. त्याने करून दिलेली चांगली सुरूवात कर्णधाराने कायम ठेवली आणि त्याने विजय हजारे ट्रॉफीमधील ऐतिहासिक शतक झळकावले.

बिहारचा कर्णधार साकिबुल गनी याने अवघ्या ३२ चेंडूत शतक झळकावले. साकिबुल गनी याचे विजय हजारे ट्रॉफीमधील हे सर्वात जलद शतक ठरले. यासह, तो लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक करणारा भारतीय फलंदाज बनला. यापूर्वी, हा विक्रम पंजाबच्या अनमोलप्रीत सिंगच्या नावावर होता, ज्याने ३५ चेंडूत शतक पूर्ण केले होते.पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी साकिबुल गनी उतरला वैभवने ८४ चेंडूत १९० धावा करत बिहारला धमाकेदार सुरुवात करून दिली. त्याने या सुरुवातीचा पुरेपूर फायदा घेतला आणि आक्रमक फलंदाजीला सुरूवात केली आणि विक्रमी शतक पूर्ण केलं. २६ वर्षीय साकिबुल गनीचं हे लिस्ट ए क्रिकेटमधील तिसर शतक होतं. त्याने नऊ चौकार आणि नऊ षटकारांच्या मदतीने शतकी खेळी साकारली.

बिहारचा कर्णधार साकीबुल गनी याने ३२०च्या स्ट्राईक रेटने ४० चेंडूत १० चौकार व १२ षटकारांसह नाबाद १२८ धावांची वादळी खेळी केली. लिस्ट ए क्रिकेट इतिहासातील हे तिसरं सर्वात जलद शतक आहे. दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या जॅक फ्रेझर मॅकगर्कने तस्मानियाविरुद्ध २९ चेंडूत शतक झळकावलं.

### दो भाई दोनो तबाही.... विजय हजारे ट्रॉफीत रोहित विराटची शतकीय कामगिरी,

दिल्ली-बीसीसीआयच्या सूचनेनंतर भारतीय संघाचे अनेक खेळाडू विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ चे सामने खेळत आहेत. यात रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या दिग्गजांसह सूर्यकुमार यादव, शुभमन गिल, अर्शदीप सिंह सारखे अनेक स्टार क्रिकेटर्स सुद्धा खेळतायत. २४ डिसेंबर पासून या सामन्यांना सुरुवात झाली असून पहिल्याच सामन्यात रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनी आपापल्या संघासाठी खेळताना शतकीय कामगिरी केली. लिस्ट ए क्रिकेटमध्ये विराटने ५८ वं शतक पूर्ण केले.

विराट - रोहितचे कमबॅक :रोहित शर्मा हा मुंबई संघाकडून मैदानात उतरेल तर विराट कोहली हा दिल्ली संघाकडून खेळतोय. रोहित शर्मा शेवटचा विजय हजारे ट्रॉफी २०१८-१९ चा सीजन खेळला होता, त्यानंतर आता ७ वर्षांनी त्याने देशांतर्गत स्पर्धेत पुनरागमन केलं. तर विराट कोहलीने शेवटची विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा २००९-१० मध्ये खेळली होती. त्यामुळे आता जवळपास १५ वर्षांनी त्याने देशांतर्गत स्पर्धेत पुनरागमन केले.

विराटने पूर्ण केल्या १६ हजार धावा : विराटने पहिल्याच सामन्यात १३१ धावांची खेळी करत शतक ठोकले. ८३ बॉलमध्ये विराटने हे शतक पूर्ण केले. दिल्लीसाठी फक्त एक धाव केल्यावर विराट कोहली हा लिस्ट ए क्रिकेटमध्ये

# विजय हजारे ट्रॉफी; पहिलाच दिवस ठरला रेकॉर्ड ब्रेकिंग!

नवी दिल्ली: विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील पहिल्याच दिवशी असं काही घडलं, जे याआधी कधीच घडलं नव्हतं.

: देशांतर्गत क्रिकेटमधील मोठी स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेला २४ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. यावेळी ही स्पर्धा आणखी खास असणार आहे. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंनाही ही स्पर्धा खेळणं बंधनकारक असणार आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे दिग्गज खेळाडू ही स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरले आहेत. पहिल्याच सामन्यात विराट आणि रोहित दोघांनी शतकं झळकावली. यासह पहिल्याच दिवशी असं काही घडलं आहे, जे याआधी कधीच घडलं नव्हतं.



### याआधी असं कधीच घडलं नव्हतं असा रेकॉर्ड




स्पर्धेतील पहिला दिवस फलंदाजांनी गाजवला. युवा फलंदाजांपासून ते अनुभवी फलंदाजांपर्यंत सर्वांनीच धावांचा पाऊस पाडला. बिहार संघाकडून खेळताना सकिबुल गनीने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान शतक झळकावलं. त्याने अवघ्या ३२ चेंडूत शतक झळकावलं. तर ईशान किशनने ३३ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. पहिल्यांदाच विजय हजारे ट्रॉफी खेळत असलेल्या वैभव सूर्यवंशीने पहिल्याच सामन्यात १९० धावांची विक्रमी खेळी केली.यासह तब्बल १० वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरलेल्या विराट कोहली आणि रोहित शर्माची बॅट देखील चांगलीच तळपली. दोघांनी शतकं झळकावली.

यासह या स्पर्धेतील सर्वात मोठा विक्रम मोडला गेला आहे. याआधी या स्पर्धेतील पहिल्याच दिवशी फलंदाजांनी १९ शतकं झळकावली होती. पण हा विक्रम मोडला आहे. कारण विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी २२ शतकं झळकावली आहेत.बिहारकडून खेळत असलेल्या वैभव सूर्यवंशीने पहिल्याच सामन्यात फलंदाजी करताना ८९ चेंडूत १९० धावांची तुफानी खेळी केली. यासह तो लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी करणारा फलंदाज ठरला. यासह लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान १५० धावा करण्याच्या विक्रमात त्याने दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज फलंदाज एबी डिव्हिलियर्सला मागे टाकलं आहे. विराट आणि रोहितने देखील दमदार फलंदाजी करून आपल्या चाहत्यांची मनं जिंकली. रोहितने सिक्किमविरुद्ध खेळताना ९४ चेंडूत १५५ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने १०१ चेंडूत १३१ धावांची खेळी केली.

## रोहित-विराटचा विजय हजारे ट्रॉफीमधील पुढील सामना कधी खेळवला जाणार?

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ ला रोहित-विराटच्या जोडीने शतकं करत दणक्यात सुरूवात करून दिली आहे. आता दुसरा सामना कधी खेळवला जाणार, जाणून घेऊया.

रोहित-विराटचा विजय हजारे ट्रॉफीमधील पुढील सामना कधी भारताच्या देशांतर्गत क्रिकेटमधील प्रसिद्ध स्पर्धा विजय हजारे ट्रॉफीला २४ डिसेंबरपासून दणक्यात सुरूवात झाली. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यांमध्ये शतकांचा पाऊस पडला आणि संघांनी अनेक मोठमोठे विक्रम आपल्या नावे केले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी एकूण २२ खेळाडूंनी शतकं झळकावली, ज्यात माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या मॅचविनिंग शतकांचा समावेश आहे. बऱ्याच वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफी खेळणाऱ्या रोहित-विराटच्या सामन्यातील कामगिरीने सर्वांची मनं जिंकली. आता या दोघांच्याही संघाचा विजय हजारे स्पर्धेतील पुढचा सामना कधी होणार आहे, जाणून घेऊया.रोहित शर्मा विजय हजारे ट्रॉफीमध्ये ७ वर्षांनी खेळण्यासाठी उतरला आणि मुंबईसाठी धमाकेदार शतक झळकावलं. जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर सिक्कीमविरुद्ध झालेल्या सामन्यात रोहित शर्माने धमाकेदार दीडशतकी खेळी केली आणि संघाच्या विजयाचा हिरो ठरला. रोहितने १८ चौकार व ९ षटकारांसह ९४ चेंडूत १५५ धावा करत लिस्ट ए क्रिकेटमधील त्याचं ३७वं शतक पूर्ण केलं. रोहितच्या या खेळीसह मुंबईने ८ विकेट्सने विजय नोंदवला. तर दुसरीकडे विराट कोहलीने दिल्ली आणि आंध्रप्रदेश यांच्यातील सामन्यात शतकी खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. विराट १० वर्षांनंतर दिल्लीकडून विजय हजारे ट्रॉफी खेळण्यासाठी उतरला होता. यादरम्यान त्याने आपला वादळी फॉर्म कायम ठेवत ८३ चेंडूत शतक झळकावलं, जे लिस्ट ए क्रिकेटमधील त्याचं ५८वं शतक ठरलं. या शतकासह त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १६ हजार धावा करत सचिन तेंडुलकरचा वर्ल्ड रेकॉर्डही मोडला. विराटच्या



### रोहित विराटचे पुढील सामने

२६ डिसेंबर - मुंबई वि. उत्तराखंड - सकाळी ९ वाजता २६ डिसेंबर - दिल्ली वि. गुजरात - सकाळी ९ वाजता

१३१ धावांच्या बळावर दिल्लीने आंध्रप्रदेश संघाला ४ विकेट्सने पराभूत केलं.

रोहित शर्मा आणि विराट कोहलीने पहिल्या सामन्यात केलेल्या कामगिरीमुळे आता हे दोघे पुढील सामना खेळण्यासाठी कधी उतरणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. रोहित आणि विराटचा पुढील सामना उद्या म्हणजेच २६ डिसेंबरला खेळवला जाणार आहे. रोहित शर्माच्या मुंबई संघाचा पुढील सामना जयपूरमध्येच सवाई मानसिंग स्टेडियममध्ये होईल तर विराटच्या दिल्लीच्या संघाचा सामना बंगळुरूमध्ये खेळवला जाणार आहे.

## न्यूझीलंडचे टीम इंडियाला गिफ्ट; वनडे मालिकेसाठी अननुभवी संघ जाहीर

दिल्ली-वर्षभरापूर्वी भारतात येऊन भारतीय संघाला कसोटी मालिकेत चीतपट करण्याची किमया साधणारा न्यूझीलंडचा संघ वनडे आणि टी२० मालिकेसाठी भारतात येत आहे. भारतीय संघाचा वर्षाचा शेवट विजयाने व्हावा असे वाटावे इतका अनुनभवी संघ न्यूझीलंडने जाहीर केला आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने मंगळवारी रात्री उशिरा वनडे आणि टी२० मालिकेसाठी संघाची घोषणा केली.वनडे मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्मा भारतीय संघाचा भाग असणार आहेत. या दोघांसह भारतीय फलंदाजांना न्यूझीलंडच्या अनुनभवी माऱ्याविरुद्ध मोठी खेळी करण्याची सुवर्णसंधी आहे. न्यूझीलंडने २०२४ मध्ये झालेल्या कसोटी मालिकेत भारताचा ३-० असा धुव्वा उडवला होता. या पराभवाची परतफेड करण्याची सर्वोत्तम संधी भारतीय संघासमोर आहे.

वनडे मालिकेसाठी न्यूझीलंड संघाचं नेतृत्व अष्टपैलू मायकेल ब्रेसवेलकडे सोपवण्यात आलं आहे. प्रमुख खेळाडू संघात परतल्यानंतर ब्रेसवेलला अंतिम अकरात स्थान मिळण्याची शक्यता धूसर आहे.

नियमित कर्णधार मिचेल सँटनर दुखापतीमुळे या मालिकेत खेळू शकणार नाही. न्यूझीलंडचा माजी कर्णधार आणि भरवशाचा फलंदाज केन विल्यमसन या काळात दक्षिण आफ्रिकेतील टी२० लीगमध्ये खेळणार असल्याने त्याने या मालिकेसाठी अनुपलब्धता कळवली आहे.

वेगवान गोलंदाजांचं त्रिकुट विल्यम ओ रुक, नॅथन स्मिथ आणि ब्लेअर टिकनर दुखापतीमुळे संघाचा भाग नाहीत. दुखापतीतून पूर्णपणे न सावरल्याने मॅट हेन्री वनडे मालिकेसाठीच्या संघाचा भाग नसेल. मुलाच्या जन्मावेळी पत्नीबरोबर राहायचं असल्यामुळे टॉम लॅथम वनडे मालिकेत खेळू शकणार नाही. वर्कलोड मॅनेजमेंटमुळे रचीन रवींद्र आणि जेकब डफी यांना वनडे मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे. लॉकी फर्ग्युसन, अॅडम मिल्न, फिन अॅलन आणि टीम सैफर्ट हे जगभरात विविध ठिकाणी सुरू असलेल्या टी२० लीगमध्ये

### कर्नाटकने केला विक्रमी लक्ष्याचा पाठलाग

**देवदत्त पड्डीकलची शतकी खेळी**

कर्नाटक-कर्नाटकने विजय हजारे चषक स्पर्धेत झारखंडविरुद्ध विक्रमी लक्ष्याचा पाठलाग केला. देवदत्त पड्डीकलच्या तडाखेबंद शतकाच्या जोरावर कर्नाटकने ४१३ धावांचं लक्ष्य ४८व्या षटकातच गाठलं. विजय हजारे स्पर्धेतला धावांचा हा सर्वोत्तम यशस्वी पाठलाग आहे. झारखंडने प्रथम फलंदाजी करताना ४१२ धावांचा डोंगर उभारला.

## शार्दुल ठाकूर झाला बाबा

नवी दिल्ली : भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर बाबा झाला आहे. शार्दुल ठाकूरने पत्नी मिताली पारूलकरबरोबर फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. शार्दुलने अचानक बाबा झाल्याची माहिती देत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. शार्दुल व मिताली यांनी २०२३ मध्ये लग्नगाठ बांधली होती.शार्दुल आणि मिताली यांनी २७ फेब्रुवारी २०२३ मध्ये लग्न केले होते, आणि आता हे जोडपे पहिल्यांदा आई-बाबा झाले आहे. शार्दुलने मुलाच्या आगमनाची आनंददायी बातमी शेअर करत काही गोड फोटो देखील पोस्ट केले आहेत. अनेक क्रिकेटपटू आणि चाहत्यांनी त्यांच्या पोस्टवर शुभेच्छा दिल्या आहेत. सध्या शार्दुल देशांतर्गत क्रिकेटमध्ये सक्रिय असून, रणजी ट्रॉफी आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये मुंबईचे नेतृत्व करताना दिसला. आगामी आयपीएल २०२६ मध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. शार्दुलने भारतासाठी



१३ कसोटी सामने खेळले असून ३३ विकेट्स घेतल्या आहेत, तसेच ४७ एकदिवसीय सामने आणि २ टी-२० सामन्यांमध्येही तो महत्वाचा खेळाडू ठरला आहे.मुंबई इंडियन्सनेही सोशल मीडियावर शार्दुल आणि मितालीला मुलाच्या आगमनाच्या शुभेच्छा दिल्या असून, चाहत्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे.

## विश्वचषक गमावल्यानंतर मी माझ्या निवृत्तीचा विचार केला होता : रोहित शर्मा

नवी दिल्ली : आयसीसी विश्वचषक २०२३ अंतिम सामन्यातील पराभव अत्यंत निराशाजनक होता. असे वाटले होते की, या खेळाने माझ्याकडून सर्वकाही हिरावून घेतले आहे. त्यामुळे मी निवृत्तीचाही विचार केला होता,' असे भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने म्हटले. घरच्या मैदानावर झालेल्या या एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेत रोहितच्या नेतृत्वात भारताने सलग ९ सामने जिंकून अंतिम फेरी गाठली होती. मात्र, निर्णायक अंतिम सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला.



एका कार्यक्रमात रोहित म्हणाला की, 'एकदिवसीय सामन्यांचा विश्वचषक २०२३च्या अंतिम सामन्यानंतर मी पूर्णपणे खचून गेलो होतो. मला वाटले की, आता हा खेळ खेळायचा नाही. कारण, त्याने माझ्याकडील सर्वकाही हिरावून घेतले आहे आणि माझ्याकडे काहीच उरलेले नाही.

यातून सावरायला मला थोडा वेळ लागला. मी स्वतःला सतत आठवण करून देत होतो की, हीच ती गोष्ट आहे ज्यावर मी खर्या अर्थाने प्रेम करतो. या गोष्टीला मी इतक्या सहजपणे सोडू शकत नाही. हळूहळू मी सावरलो, माझी हरवलेली ऊर्जा परत मिळवली आणि मी पुन्हा

# भारतीय महिला गोलंदाजांची चमकदार कामगिरी




**विशाखापट्टणम:** महिला यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा टी-२० सामन्यात भारतीय महिला गोलंदाजांनी पुन्हा एकदा चमक दाखवली. भारतीय महिला गोलंदाजांपैकी वैष्णवी शर्मा आणि श्री चरणी यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. तर क्रांती गौड आणि स्नेह राणा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. भारतीय महिला संघाच्या भेदक गोलंदाजीमुळे श्रीलंकेचा संघ १२८ धावांवर गारद झाला. याआधी सलामीच्या सामन्यात भारतीय संघाने विजयी सलामी दिली. ज्या मैदानात पहिला सामना खेळवण्यात आला त्याच विशाखापट्टणम येथील क्रिकेट स्टेडियमवर दोन्ही संघातील दुसरा सामना रंगणार आहे. आयसीसी महिला विश्वचषकातील ऐतिहासिक विजयानंतर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने श्रीलंकेविरुद्धच्या द्विपक्षीय टी-२० मालिकेतून आगामी टी-२० वर्ल्ड कपच्या तयारीची सुरुवात केली आहे. पहिल्या टी-२० सामन्यात जेमिमा रॉड्रिग्स हिने नाबाद अर्धशतकी खेळीसह खास छाप सोडली. दुसर्या सामन्यात तिच्यासह स्मृती मानधना आणि शफाली वर्माच्या कामगिरीवर सर्वांच्या नजरा असतील.

भारत महिला विरुद्ध श्रीलंका महिला यांच्यातील दुसरा टी-२० सामना मंगळवारी, २३ डिसेंबरला खेळवण्यात येणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी सात वाजता विशाखापट्टणमच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. दोन्ही संघातील कर्णधार ६ वाजून ३० मिनिटांनी नाणेफेकीसाठी मैदानात उतरतील.

भारत महिला विरुद्ध श्रीलंका महिला दुसरा टी-२० सामना स्टार स्पोर्ट्स नेटवर्कच्या चॅनेलवर थेट प्रेक्षपित होईल.ऑनलाईनच्या माध्यमातून जिओहॉटस्टार आणि वेबसाईटवर हा सामना लाईव्ह स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध असेल. पहिल्या टी-२० सामन्यात भारताने श्रीलंकेला ६ बाद १२१ धावांवर रोखत ८ विकेट्स



राखून एकतर्फी मात दिली होती. जेमिमा रोड्रिग्जने नाबाद ६९ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची भावना : भावूक वातावरणात लातूरकरांनी केली श्रद्धांजली अर्पण

**लातूर/प्रतिनिधी :** माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ आहेत. प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहुन लोकांच्या हिताची त्यांनी अनेक कामे केली. सदैव राष्ट्राच्या भल्याचाच विचार केला. धर्म, पक्ष यापलिकडे जाऊन मानवतेला प्राधान्य देत त्यांनी सर्वांना जोडून घेतले. म्हणून खऱ्या अर्थाने ते अजातशत्रु होते. एक कणखर नेते, विद्वत्ता आणि नैतिक मुल्यांचे प्रतिक म्हणून ते कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.






शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूरकरांच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी खासदार व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. अशोक कुकडे, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित देशमुख, माजी खासदार सुनील गायकवाड, लातूर अर्बन बँकेचे संस्थापक प्रदीप राठी, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, धनंजय पाटील, ज्येष्ठ पत्रकार बी. व्ही. मोतीपवळे, व्यंकट बेद्रे, माजी कुलगुरू अशोक ढवण यांनी मनोगतातून शिवराज पाटील चाकूरकर यांच्या व्यक्तिमत्वाला उजाळा दिला.

शिवराज पाटील यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, रुद्राली पाटील चाकूरकर, रुषिका पाटील चाकूरकर, राजेश्वर बुके, माजी प्राचार्य नागोराव कुंभार, सुनील कोचेटा, उदय गवारे, अभय साळुंके, रमेश बियाणी, विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक, आर्थिक, विधी, कला-क्रीडा, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. 'वैष्णव जन तो', 'रघुपती राघव राजाराम' या भजनांनी सभेची सुरुवात झाली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या शोकसंदेशांचे बी. व्ही. मोतीपवळे यांनी वाचन केले. प्रा. अश्विनी रोडे, प्रा. गणेश बेळंबे यांनी सूत्रसंचालन केले.

**विचारधारा वेगवेगळ्या तरी दृढ संबंध**

डॉ. अशोक कुकडे : साठ वर्षांपूर्वी वैद्यकीय व्यवसायासाठी मी लातूरात आलो. त्यावेळी पहिल्याच वर्षी शिवराज पाटील यांचा परिचय झाला. आमच्यातील संबंध दृढ झाले. आमच्या राजकीय विचारधारा वेगवेगळ्या होत्या. तरी एकमेकांतील संबंध दृढ होते, याचे अनेकांना आश्चर्य वाटत असे. भूकंपानंतर परदेशातून आलेला १ लाख डॉलर्स निधी त्यांच्यामुळेच विवेकानंद रुग्णालयाला मिळाला होता. राजकारणापेक्षा समाजकारण, राष्ट्रकारण मोठे असते, असे त्यांना वाटत असे. प्रकाशाचा मार्ग दाखवणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे त्यांचे व्यक्तित्व होते.

**चाकूरकर पंतप्रधान झाले असते**

जनार्दन वाघमारे : प्रतिभाशाली आणि चिंतनशील व्यक्तीमत्व असलेले शिवराज पाटील यांनी आपल्या कार्यकाळात अनेक विकासकामे केली. मात्र त्याची त्यांनी जाहिरातबाजी केली नाही. लातूरच्या पाण्याचा प्रश्न त्यांनीच सोडवला होता. अशी लातूरमधील कितीतरी कामे त्यांच्यामुळेच मार्गी लागलेली आहेत. आपल्या जीवनात त्यांनी गरुडासारखी उत्तुंग झेप घेतली. पण, स्वतःविषयी ते कधीही बोलत नसत. २००४ मध्ये ते निवडून आले असते तर नक्कीच पंतप्रधान झाले असते. लोकांशी एकरूप झालेले, राजकारणातील संत म्हणता येईल, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

**विलासरावांना घडवण्यात शिवराज पाटलांचा वाटा**

अमित देशमुख : मी लहानपणापासूनच शिवराज पाटील चाकूरकर या नावाचा दबदबा पाहत आलो आहे. आजोबांकडून, वडिलांकडून, काकांकडून, आईंकडुन त्यांच्याबद्दल कामय ऐकत आलो आहे. पुढे मलाही त्यांचा स्नेह आणि आशीर्वाद लाभला. विलासराव देशमुख यांना घडवण्यात शिवराज पाटील यांचाच हात आहे. हा प्रसंग आम्ही कायम उराशी बाळगून आहोत. शिवराज पाटील यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना वेगवेगळी पदे मिळत गेली. यांच्या मागे पदे पळत राहिली. त्या प्रत्येक पदांना त्यांनी योग्य न्याय दिला. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे ते अतिशय लाडके सहकारी होते. चाकुरकरांनी लातूरचा लौकिक भारतभर आणि भारताबाहेरही वाढवला. त्यांचे व्यक्तीमत्व 'हिरो'सारखे होते.

**मुल्य जगून दाखवणारे उत्तुंग नेतृत्व**

आदिनाथ सांगवे : शिवराज पाटील यांचे व्यक्तिमत्त्व खरोखर दीपस्तंभासारखे होते. त्यांनी सच्चेपणा, नैतिकता, विद्वत्ता, तत्वनिष्ठता ही मूल्य इतरांना सांगितली असे नाही. तर ती स्वत: जगून दाखवली. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी असे होते. त्यांच्या सानिध्यात आलेल्या प्रत्येकाला त्यांची मुल्य शिकता आली. त्यांची वैचारिक उंची आभाळाऐवढी होती. त्यांची संपूर्ण कारकीर्द निस्पर्ह व निष्कलंक राहिली आहे. त्यांच्या जाण्याने एक बहुआयामी व उत्तुंग व्यक्तिमत्व हरपले आहे.

**सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घातला**

प्रदिप राठी : शिवराज पाटील यांच्या जाण्याने एक मोठे नेतृत्व लूप्त झाले. विलासराव देशमुख यांच्या मागे त्यांनीच मोठी ताकद उभी केली होती. त्यांना आमदार केले. मंत्री बनवले. शिवराज पाटील यांनी कधीही कोणाबद्दलही नकारात्मक दृष्टीकोन बाळगला नाही. ते अतिशय सुसंस्कृत नेते. त्यांनी सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घालून दिला. त्यांचे अनेक अनुयायी होतील. पण त्यांच्यासारखे कोणी होणार नाही. लक्ष्मीरमण लाहोटी : राजकारणात त्यांच्या इतकी उंची लातूरात अन्य कोणाला गाठता येईल, असे वाटत नाही. त्यांचे आचरण अनुकरणीय असेच होते. डॉ. शिवाजी काळगे : शिवराज पाटील हे अतिशय उत्तुंग नेते होते. दिल्लीत असताना त्यांची वारंवार आठवण होते.

## सैनिकी मुलां-मुलींच्या वसतिगृहाला धान्य पुरवठा करण्यासाठी दरपत्रक सादर करावे

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलां-मुलींचे वसतिगृह येथे अंदाजे प्रतिदिन १०० विद्यार्थ्यांना दरमहा धान्य खरेदी करण्यात येते. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व धान्य विक्रेता, व्यापारी यांनी १ डिसेंबर, २०२५ ते ३० एप्रिल, २०२६ या कालावधीसाठी सर्व धान्याचे कमीत कमी चार महिन्याचे स्थिर भाव दरपत्रक जिल्हा सैनिक कलयाण अधिकारी, लातूर यांचे नावे २९ डिसेंबर, २०२५ पर्यंत बंद पॉकेटमध्ये सैनिक मुलांचे-मुलींचे वसतिगृह लातूर येथे सादर करावे, असे लातूर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## लातूर जिल्ह्यात धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये केंद्र सरकार व कृषि आयुक्तालय यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर- घुगे यांच्या अध्यक्षतेखाली धरती माता बचाव अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीमध्ये रसायनिक खतांच्या अतिरिक्त वापर आणि बिगर कृषि कारणासाठी होणाऱ्या रसायनिक खत वापरावर लक्ष ठेण्याकरिता ग्रामस्तरावरील ग्राम कृषि विकास तथा धरती माता बचाव निगरणी समितीमार्फत गाव पातळीवर कळविण्यात आले आहे. तसेच तालुका अथवा उपविभागस्तरावर धरती माता बचाव निगरणी समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यामध्ये धरती माता बचाव अभियान अंतर्गत बागायत क्षेत्र व खताचा जास्तीचा वापर असणाऱ्या ग्रामपंचायतस्तरावर १०० गावांची निवड करावी. सदर निवडलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत ग्राम कृषि विकास समिती बैठक घेऊन रासायनिक खताचा वापर कमी करणे, बिगर कृषि कामासाठी खतांचा वापर होवू नये, यासाठी कृषि विज्ञान केंद्र शास्त्रज्ञ व समिति सदस्यद्वारे गावपातळीवर प्रचार व प्रसिद्धी करणे, तसेच रासायनिक खताचा जास्तीचा वापरावर लक्ष ठेवून, असा प्रकार होत असल्यास तो वेळीच तालुका व जिल्हापातळीवरील संबधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी भास्कर कोळेकर, आत्मा प्रकल्प संचालक डी. पी. जाधव, कृषि विकास अधिकारी दीपक सुपेकर, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. डिग्रसे, मोहीम अधिकारी एम. बी. बीडबाग, आत्माच्या प्रकल्प उपसंचालक श्रीमती एम.यू बांगर, कृषि उपसंचालक एल.एम. खताळ, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक संतोष लाळगे, आर. सी. एफ. कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी निखिल मानकर उपस्थित होते.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे आणि त्यांच्यातील सुप्त आजारांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लातूर येथील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य तपासण्यात आले. डॉ. छाया जंगले, डॉ. आयोध्या सानप, डॉ. विद्या वाघमारे, डॉ. कांचन मस्के, डॉ. किरण काटे भालचंद्र किर्ते (आरोग्य सेवक), मनीषा शिंदे, सुप्रिया कांबळे, शिला पांढरे, प्रतीक्षा इंगळे या अनुभवी डॉक्टरांच्या पथकाने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासले.

तसेच लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची ही आरोग्य तपासणी करण्यात आली.



विद्यार्थ्यांमधील आरोग्य समस्या लवकर ओळखणे आणि त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना सकस आहार घेण्याचे आणि मैदानी खेळ खेळण्याचे महत्त्व पटवून दिले. शाळेच्या प्राचार्यांनी सांगितले की, ''केवळ शिक्षणच नव्हे, तर विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वास करते, त्यामुळे असे उपक्रम आम्ही दरवर्षी राबवतो.''

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी, यांनी आरोग्य तपासणीसाठी उपस्थित पथकाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एआय मुळे बदलते करिअरचे क्षितिज!

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'एआय आणि करिअर संधी' मार्गदर्शन कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागामार्फत 'एआय आणि करिअर संधी' या विषयावर करिअर मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमात पुणे येथील निलया फाउंडेशनचे चेतन गोडबोले यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय क्षेत्रातील सद्यस्थिती, भविष्यातील करिअर संधी, नव्या कौशल्यांची आवश्यकता तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःला कसे सक्षम करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

एआयचा शिक्षण, उद्योग, व्यवसाय व रोजगार क्षेत्रावर होणारा प्रभाव त्यांनी सोप्या शब्दांत आणि उदाहरणांसह स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जी.आर. लहाने होते. त्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी करिअरची योग्य दिशा निवडावी, असे आवाहन केले. गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण यांनी नियोजनबद्ध अभ्यास आणि योग्य करिअर मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी डॉ. विशाल वर्मा यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. रूपा गिल्डा यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अजय चव्हाण, प्रा.दिपाली जिरोबे शेख आणि प्रा.कृष्णाई पाचांगे यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## कल्याण ज्वेलर्सच्या लातूर येथील शोरूमचे उद्घाटन २६ डिसेंबर रोजी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतातील सर्वात विश्वसनीय आणि आघाडीच्या ज्वेलरी ब्रँड्सपैकी एक, कल्याण ज्वेलर्सने लातूरमधील कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, मेन रोड येथे नवीन शोरूम सुरु करत असल्याची घोषणा केली आहे. शुक्रवार,२६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रख्यात अभिनेत्री जेनेलिया डिसुझा यांच्या हस्ते शोरुमचे उदघाटन केले जाईल. पश्चिम भारतातील सर्व महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये कल्याण ज्वेलर्सने आपले पाय रोवले आहेत, महाराष्ट्रामध्ये हे त्यांचे २९वे शोरूम आहे. नवनवीन डिझाइन्स आणि जागतिक दर्जाची सेवा; लातूरकरांच्या दागिन्यांच्या खरेदीला एक नवी उंची लाभेल.नवीन शोरूमच्या उद्घाटनाबद्दल बोलताना कल्याण ज्वेलर्सचे कार्यकारी संचालक श्री. रमेश कल्याणरामन म्हणाले, ''एक कंपनी म्हणून, ग्राहकांच्या खरेदीच्या अनुभवातील प्रत्येक पैलू अधिक समृद्ध करणारी एक सर्वसमावेशक इकोसिस्टिम निर्माण करण्याच्या दिशेने आम्ही मोठी प्रगती केली आहे. महाराष्ट्र ही आमच्यासाठी सर्वात महत्त्वाची बाजारपेठ राहिली असून, गेल्या काही वर्षांत आम्ही येथे धोरणात्मकरीत्या विस्तार केला आहे. लातूर येथील नवीन शोरूम या प्रदेशाप्रती असलेली आमची वचनबद्धता अधिक दृढ करेल आणि आमच्या ग्राहकांसाठी अधिक सुविधा, सुलभता आणि मूल्य प्रदान करेल, असा आम्हाला विश्वास आहे.''

या नवीन शोरूमच्या शुभारंभाचे औचित्य साधून, कल्याण ज्वेलर्सने स्टोअरमध्ये खास ऑफर्सची घोषणा केली आहे. यामध्ये निवडक दागिन्यांच्या मजुरीवर १५०० रुपयांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. सोबतच ग्राहकांना कल्याण स्पेशल गोल्ड बोर्ड रेटचा लाभ घेता येईलजो बाजारपेठेतील सर्वात कमी दर असून सर्व शोरूम्समध्ये एकसमान आहे. लाँचच्या निमित्ताने मिळणारे हे फायदे मर्यादित काळासाठीच उपलब्ध आहेत.कल्याण ज्वेलर्समधील प्रत्येक दागिना हा बीआयएस हॉलमार्क असलेला असून त्यावर शुद्धतेच्या विविध चाचण्या केल्या जातात. याव्यतिरिक्त, ग्राहकांना ब्रँडचे सिग्नेचर ४-स्तरीय आश्वासन प्रमाणपत्र मिळते,जे सोन्याची शुद्धता,दागिन्यांची आजीवन मोफत देखभाल, उत्पादनाची सविस्तर माहिती आणि पारदर्शक एक्सचेंज व बाय-बॅक धोरणांची हमी देते.हे आश्वासन आपल्या मौल्यवान ग्राहकांना सर्वोत्तम गुणवत्ता आणि विश्वास प्रदान करण्याप्रती असलेल्या कल्याण ज्वेलर्सच्या अढळ बांधिलकीवर भर देते. या शोरूममध्ये कल्याणचे लोकप्रिय हाऊस ब्रँड्स देखील उपलब्ध असतील, ज्यात मुहूर्त (लग्नाचे दागिने), मुद्रा (हस्तकला केलेले अँटिक दागिने), निमा (मंदिर शैलीतील दागिने), ग्लो (डान्सिंग डायमंड्स), झिया (सॉलिटेअरसारखे हिऱ्यांचे दागिने), अनोखी (अनकट डायमंड्स), अपूर्वा (विशेष प्रसंगांसाठी हिरे), अंतरा (लग्नासाठीचे हिऱ्यांचे दागिने), हेरा (अगदी रोज वापरता येतील असे हिऱ्यांचे दागिने), रंग (मौल्यवान खड्यांचे दागिने) आणि अलीकडेच लाँच केलेले लीला (रंगीत खडे आणि हिऱ्यांचे दागिने) या कलेक्शन्सचा समावेश असेल.ब्रँड, त्यांची कलेक्शन्स आणि ऑफर्सविषयी अधिक माहितीसाठी कृपया येथे संपर्क साधावा - https://www.kalyanjewellers.net

अटी व शर्ती लागू आहेत.*

KALYAN JEWELLERS

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHEKH NIZAMSAB SARDARSAB**. TO **NIJAMSAB SARDARSAB SHAIKH.**

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **NIJAMSAB SARDARSAB SHAIKH** will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- **SHEKH NIZAMSAB SARDARSAB.**
NEW NAME:- **NIJAMSAB SARDARSAB SHAIKH.**
Address :- AT POST KINIYALLADEVI. TQ.UDGIR, DIST. LATUR -413518
AADHAR NO.- 720892220910
Mob. No.-9764276945

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHADUL**. TO **SHADULLA HASANSAB BAGWAN.**

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SHADULLA HASANSAB BAGWAN** will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- **SHADUL.**
NEW NAME:- **SHADULLA HASANSAB BAGWAN.**
Address :- SHIVAJI NAGAR, AUSA ROAD, NILANGA. TQ. NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 528544687386
Mob. No.-9922200985

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# धाराशिव येथे महिलांसाठी कृषी प्रशिक्षण व उत्पादक प्रदर्शनाचे आयोजन

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- प्रतिनिधी महिलांचा प्रत्येक क्षेत्रात मोठा वाटा आहे. त्यांच्याकडे असलेला उपजत स्टॅमिना आणि प्रचंड कष्ट करण्याची तयारी पाहता, महिला जे करू शकतात ते दुसरे कोणीही करू शकत नाही. आजच्या काळात महिलांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता, आधुनिक तंत्रज्ञान आणि कृषीपूरक व्यवसायांकडे वळून आपली आर्थिक प्रगती साधावी, असे प्रतिपादन उपविभागीय कृषी अधिकारी धाराशिव माननीय श्री. महादेव असलकर सरांनी केले.

सोमवार, २२ डिसेंबर २०२५ रोजी धाराशिव येथील डी.पी.डी.सी. सभागृहात कृषी विभाग आणि 'मंजिरी सखी प्रोड्युसर कंपनी' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला शेतकरी प्रशिक्षण व प्रदर्शनाप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

महिलांच्या कतृत्वाचे प्रदर्शन आणि गौरव या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांनी स्वतः परिश्रमातून तयार केलेली विविध उत्पादने, सेंद्रिय भाजीपाला आणि मंजिरी सखी कंपनीच्या उत्पादित मालाचे लावण्यात आलेले स्टॉल. या प्रदर्शनातून महिलांच्या व्यावसायिक कौशल्याचे दर्शन घडले.

व्यासपीठावर उपविभागीय कृषी अधिकारी माननीय श्री. महादेव असलकर, तालुका कृषी अधिकारी मा. श्री. देवकते सर, मंडळ अधिकारी मा. श्री. बचोटे सर, मा. श्री. कानडे सर, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ मा. श्री. अरबाड सर, वावर खझच् पुणेचे श्री. प्रदीप बिराजदार, मंजिरी सखी ॠझउ च्या संचालिका श्रीमती दिपाली काकासाहेब थोडसरे आणि श्रीमती राणी शिरोळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच मंजिरी सखी ॠझउ चे लीडर सौ. सुरेखा ढवळे, मनीषा गुळवे, निकिता गवळी आणि SBIF च्या सर्व लीडर उपस्थिती होती.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि प्रेमा ताई यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली

याप्रसंगी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिक मिळवून धाराशिवचा नावलौकिक वाढवल्याबद्दल मंजिरी सखीच्या सौ. दिपाली काकासाहेब थोडसरे आणि सौ. सुमित्रा शिराळ व त्यांच्या पूर्ण टीम चा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय अन्नधान्य व पोषण अभियान कडधान्य, भरडधान्य व पौष्टिक तृणधान्य अंतर्गत रब्बी ज्वारी, मका व हरभरा या पिकांचे रब्बी हंगाम प्रशिक्षण सन २०२५-२६ अंतर्गत प्रशिक्षण राबविणेबाबत सर्वांना यापुर्वीच सुचना दिल्या .

तज्ज्ञांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे प्रशिक्षण सत्रात विविध विषयांवरील तज्ज्ञांनी महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले:

**सेंद्रिय शेती व योजना:** श्री. असलकर सर यांनी प्रधानमंत्री अन्न सुरक्षा योजना आणि गट शेतीचे महत्त्व सांगितले. सेंद्रिय शेती हा केवळ व्यवसाय नसून कुटुंबाला विषमुक्त आणि आरोग्यदायी अन्न देणारा मार्ग आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

तसेच तालुका कृषी अधिकारी मा. श्री. देवकते सर यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'महाविस्तर AI' पबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. हवामान अंदाज, बाजारभाव आणि कीड व्यवस्थापनासाठी हे प शेतकऱ्यांचा सोबती असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतीला जोडव्यवसाय म्हणून शेळीपालन या व्यवसाय कसा पूरक आहे आणि त्याची सुरवात कशी करायची याविषयी माहिती व मार्गदर्शन केले.

**पिक व्यवस्थापन:** के.व्ही.के. तुळजापूरचे शास्त्रज्ञ डॉ. श्री. अरबाड सर यांनी रब्बी हंगामातील ज्वारी, मका व हरभरा या पिकांच्या आधुनिक लागवड तंत्रज्ञानाबाबत तांत्रिक माहिती दिली.

**सौर तंत्रज्ञान:** 'वावर'च्या प्रतिनिधीं प्रदीप बिराजदार यांनी सोलर ट्रॅप आणि 'लूर'च्या वापराबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देऊन कीड नियंत्रणाचे उपाय सांगितले.

**महाबीज:** जिल्हा व्यवस्थापक श्री. इनामदार सर यांनी मार्गदर्शन करत उपस्थित शेतकरी महिलांना महाबीज नवीन वर्षाचे कॅलेंडरचे वाटप केले.

**सेंद्रिय उत्पादनांचे आकर्षण :**

कार्यशाळेच्या ठिकाणी महिला शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला सेंद्रिय भाजीपाला, डाळी, फळे तसेच दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा आणि वावर खझच् उत्पादनांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उपस्थित अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. या कार्यक्रमास धाराशिव परिसरातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

धाराशिव, बेंबळी, महादेववाडी, बरमगाव, सांजा ,जहागीरदारवाडी , केशेगाव आणि वरुडा या गावातील सभासद महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गट, कृषी सखी आणि विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवत रब्बी हंगाम २०२५-२६ चे योग्य नियोजन समजून घेतले.

महिला सक्षमीकरणाचा 'मंजिरी' पॅटर्न :

मंजिरी सखी ॠझउ च्या संचालिका दिपाली काकासाहेब थोडसरे यांनी संस्थेच्या ७ वर्षांच्या प्रवासाचा आढावा दिला. महिलांनी केवळ 'चूल आणि मूल' यामध्ये न अडकता आर्थिक प्रगतीसाठी ॠझउ च्या माध्यमातून एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना राणी शिराळ यांनी महिलांच्या आत्मविश्वासाला दाद देत संस्थेच्या भविष्यातील वाटचालीचा संकल्प सोडला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंजिरी सखी चे सर्व पदाधिकारी आणि कृषीविभागाचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लोकशाही बळकटीसाठी SIR विधेयक व निवडणूक सुधारणांवर सविस्तर बैठक



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- लोकशाही अधिक मजबूत व पारदर्शक करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून नवीन SIR (Special Intensive Revision) विधेयक व निवडणूक सुधारणा (Election Reforms) यासंदर्भात भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, धाराशिव येथे सविस्तर बैठक पार पडली.

या बैठकीत मतदारयादीत पात्र नागरिकांचे नाव समाविष्ट करणे, मृत्यू पावलेल्या व्यक्तींची नावे वगळणे तसेच घुसखोर/अपात्र नागरिकांचे मतदान अधिकार रद्द करून त्यांची नावे मतदारयादीतून काढून टाकणे या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

मतदार यादी अधिक पारदर्शक, अचूक व विश्वासार्ह कशी करता येईल, यावर मार्गदर्शन करताना मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, पात्र मतदारांची योग्य नोंदणी करणे आणि अपात्र मतदारांना यादीतून वगळणे हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारांची पडताळणी करण्यात येते. यासाठी नागरिकांना ऑनलाईन (ECINET App) तसेच ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध असून, कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क नाकारला जाऊ नये आणि मतदार यादीत कोणतीही अपात्र व्यक्ती राहू नये, याबाबत उपस्थित कार्यकर्त्यांना सविस्तर व योग्य मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीस श्री. मल्हार दादा पाटील, मा. जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नूतन नगराध्यक्ष सौ.नेहा राहुल काकडे,शहराध्यक्ष श्री.अमित भैया शिंदे,श्री.नेताजी आबा पाटील,श्री.सुनील काकडे, श्री.राहुल काकडे,श्री.राजसिंह राजेनिंबाळकर,श्री.दत्ता बंडगर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# समाधानकारक पावसामुळे यावर्षी चिंचेने लगडले वृक्ष, उत्पन्न वाढेल:भूम तालुक्यात फळबागांसह चिंचेच्या झाडांचीही लागवड

गणेगाव (प्रतिनिधी)- भूम तालुक्यातील गणेगावसह परिसरातील चिंच उत्पादक यंदा होणार मालामाल झिरो बजेट शेतातील प्रमुख पिक शेतकऱ्याचा कल्पवृक्ष पर्यावरणाचा सच्चा मित्र चिंचाचे झाडे दिलखुलासपणे बहरलेत सर्व बाबीनी शेतकऱ्यांसाठी चिंच झाड वरदान आहे शुन्य खर्चावर हजारो रुपयाचा नफा मिळवून देणारे झाड म्हणून चिंचेकडे पाहिले जाते भूम तालुक्यात आजही बऱ्याच शेतकऱ्याकडे १०० ते १५० वर्षाची झाडे आहेत. कोरडवाहू फळ झाडामधील हे एक महत्वाचे पीक आहे. जुने लोक भविष्याचा विचार ठेऊन शेताच्या बांधावर चिंच आंबा जांभूळ कडूलिंब नारळ पेरू अशा वृक्षाची लागवड करत जेणेकरून सर्व फळे घरचया घरी उपलब्ध व्होवीत व पुढच्या पिढीला याचा लाभ मिळावा लागवडी नंतर पहिली तीन ते चार वर्षे झाडाची जपणूक करावी लागते नंतर ते आपोआप वाढते दुष्काळातही फळ देणारा कल्पतरू आहे दहा वर्षाच्या एका झाडाला सुमारे १०० ते १५० किलो तर वीस वर्षाचे एक झाड सुमारे ५०० किलो इतके उत्पादन देते कोणत्याही खर्चाशिवाय शेतकऱ्याला एका झाडाचे २० ते २५ हजाराचे उत्पादन सहज मिळू शकते चिंचा विकण्यासाठी बार्शी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात उलाढाल होते तसेच नगर बाजार पेठेतही विकली जाते यंदा चिंचा झोडण्यासाठी आठशे ते नउशे रुपये रोजगार आहे तसेच चिंचा फोडणाऱ्या महिलाना १० रुपये किलो दिला जातो मागील वर्षी ४०० रुपये किलोला दर, विद्यापीठाने संशोधन करावे आंबट गोड चिंच परदेशातून भारतात मोठ्या प्रमाणात आयात होते ती येथे ३००ते ४०० रुपये किलो दराने विकली जाते. तेव्हा महाराष्ट्र कृषी विद्यापिठाने यात आणखी संशोधन करावे व लागवडी साठी शासनाकडून पोत्सहान मिळावे ए. जी. गायकवाड , कृषी सहायक बार्शीच्या बाजारपेठेत फोडलेल्या चिंचाना सहा ते आठ हजार भाव मिळाला यामुळे अनेकांना चांगले चलन मिळाले रोजगारही उपलब्ध झाला या वर्षी चिंचाची झाडे बहरल्याने मागील वर्षीच्या तुलनेत मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे चिंच चिंचुके व टरफले याचा सर्वांगाने गम, कुंकू, स्टार्च, चटणी, सांबर, पाणीपूरी, सॉस, सरबत, पन्हे, औषधे, चॉकलेट, घोगड्याची खळ इत्यादी उपपदार्थ निर्मितीत वापर होतो . म्हणून चिंचाना मोठा दर मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल, अशी आशा आहे.

पूर्वजांनी लावलेल्या झाडाचे संगोपन पुढील पिढी करीत असली तरी नव्याने झाडे लावण्याची गरज आहे तसेच विक्री व उत्पादन यात बदल व्हायला हवा चिंचेचा मोहर गळू नये व चिंच फोडणे यामध्ये संशोधन व्हायला हवे. अमर खैरे, शेतकरी ईडा गणेगाव परिसरात चिंचेची झाडे लगडलेली दिसत आहेत.

# वातावरण बदलाने तुरीच्या उत्पन्नात घट

उमरगा(प्रतिनिधी)-परतीच्या पावसाने खरीप हंगामातील तुरीचे पिक वाया जाण्याची भीती व्यक्त होत असताना पावसाने उघाड दिली. मात्र मध्यंतरी वातावरण बदल व पहाटे झालेल्या धुईने मोठ्या प्रमाणात फुल, पान गळती झाल्याने तुर पिकाचे नुकसान झाले परिणामी एकच भार बसल्याने मुबलक उत्पन्नाची आशा मावळली होती. सद्यस्थितीत तुर काढणी अंतिम टप्प्यात आली असलीतरी उत्पन्नात मात्र घट झाली आहे.

यंदाच्या खरीप हंगामातील पिकांचे परतीच्या पावसाने कमालीचे नुकसान झाल्याने रब्बीच्या आशा काही प्रमाणात पल्लवीत झालेल्या होत्या परतीचा पाऊस, वातावरणात झालेल्या बदलाने सर्वाधिक फटका तुरीच्या पिकांना बसला आहे. धुक्याने फुलोऱ्यात असलेल्या तुरीच्या पिकांचे धुईमुळे नुकसान झाले. शेतकरी तुरीच्या नगदी पिकावर वर्षाचे नियोजन करतो, मात्र यंदा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महागड्या औषधीची फवारणी करण्याची वेळ आली. सद्यस्थितीत तुरीच्या काढणीला सुरुवात झाली असून पदरमोड करून औषध फवारणी केली तरी तुरीला एकच भार बसल्याने मुबलक उत्पन्न होण्याची आशा मावळली. तूर रास केल्यानंतर किमान खर्च तरी निघाला तर उत्तम होइल अशी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करीत आहेत. शेतकऱ्यांनी तुरीच्या राशीं करण्यास वेग दिला असून बहुतांश ठिकाणी राशी पूर्ण होत आल्या आहेत. यंदाच्या हंगामात उत्पादनात घट झाली असल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील चार वर्षापासुन सततच्या दुष्काळी आणि वातावरण बदलाच्या स्थितीमुळे शेतकऱ्याना आर्थिक फटका बसत असलातरी शेतकरी राजा हताश न होता जोमाने उभा राहून यंदाच्या खरिपातील पेरण्या केल्या, पेरणी नंतर सुरवातीला पिकांना उपयुक्त असा पाऊस झाल्याने पिके जोमात होती मात्र त्यानंतर सततच्या पावसाने पिकांची वाढ खुंटली, योग्य तशी फळधारणा ही झाली नाही. त्यातच अतिवृष्टी अन परतीच्या पावसाने रोगराई उपद्रव वाढल्याने शेतकऱ्यांनी किडीवर महागडी कीटकनाशक फवारणी करून जोपासना केली. वातावरणाच्या बदलाने त्याचा उपयोग झाला नसल्याने उत्पन्नात घट झाल्याचे चित्र दिसत आहे.

धुक्यामुळे फुलगळती परिणामी उत्पन्न घटले गेल्या काही वर्षांपासून खरिपातील प्रमुख पीक म्हणून शेतकरी सोयाबीन, उडिद, मूग, तूर आदी पिकांना अधिक पसंती देत आहेत. परतीच्या पावसामुळे पाण्याचा प्रश्न सुटला असलातरी ऐन सोयाबीनचे काढणीत पावसाने सुरुवात केल्याने काढणीला आलेले सोयाबीन ही पाण्यात भिजुन नुकसान झाल्याने हाताशी आलेले पीक पाण्यात गेले. फळधारणेत असलेल्या तुरीवर धुक्यामुळे फुल गळती झाल्याने फळधारणा कमी झाली परिणामी उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशा आली आहे.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे: अंतर्गत रसुल रा. रामनगर उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव, सचिन रा. महादेव गल्ली उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव, विनोद रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲटो रिक्षा व मॅझीक एक्सप्रेस वाहन व मॅझीक ही वाहने शेत गट नं ६३४ मध्ये माणकेश्वर शिवार येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये उमरगा पो.ठा. येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत.

# सास्तूर येथे मोफत डायलिसिस सुविधा सुरू; स्पश रुग्णालय व एचएलएलच्या सहकार्याने ग्रामीण गरजू किडनी रुग्णांची सोय

लोहारा(प्रतिनिधी)-तालुक्यातील सास्तूर येथील स्पर्श रुग्णालयात मोफत डायलिसिस सुविधा सुरू करण्यात आली असून, त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब व गरजू किडनी विकारग्रस्त रुग्णांची मोठी अडचण दूर झाली आहे. आतापर्यंत डायलिसिससाठी रुग्णांना जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरात जावे लागत होते. यामुळे प्रवासाचा खर्च, शारीरिक त्रास आणि मानसिक तणाव सहन करावा लागत होता.

विशेषतः गरीब शेतकरी, शेतमजूर व रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांना हा उपचार खर्च परवडणारा नव्हता. अनेक रुग्ण नियमित उपचारांपासून वंचित राहत होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन सास्तूर येथील स्पर्श रुग्णालय आणि एचएलएल यांच्या सहकार्याने ८ खाटांचे अद्ययावत डायलिसिस उपचार केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात आधुनिक यंत्रसामग्री, आवश्यक उपकरणे तसेच प्रशिक्षित व अनुभवी कर्मचारी वर्गाची नेमणूक करण्यात आली आहे.

या सुविधेमुळे आता ग्रामीण भागातील रुग्णांना जवळच्या ठिकाणीच दर्जेदार आणि मोफत उपचार मिळणार आहेत. याचा लाभ घेऊन रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार असून त्यांच्या आरोग्यात सुधारणा होण्यास हातभार लागणार आहे. ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू रुग्णांनी या मोफत डायलिसिस सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर तसेच स्पर्श उपजिल्हा रुग्णालयाचे प्रकल्प व्यवस्थापक रमाकांत जोशी यांनी केले आहे. त्यांनी डायलिसिस उपचार घेताना डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करणे, स्वच्छता राखणे, योग्य आहार घेणे व नियमित तपासण्या करणे आवश्यक असल्याचेही सांगितले आहे. गरजूंनी आवश्यक लाभ घेण्याचे केले आवाहन... हीमोडायलिसिस नंतर थकवा, अंगदुखी, कमी रक्तदाब ,मळमळ, उलट्या, डोकेदुखी, खाज सुटणे, कोरडी त्वचा, भूक मंदावणे, रक्त कमी होणे शरीरातील क्षाराचे प्रमाण कमी होणे, झोप न येणे इत्यादी किरकोळ समस्या उदभवू शकतात. तरीदेखील किडनी संपूर्णपणे निकामी होऊ नये या किरकोळ समस्या उदभवल्या तरी महाडायलेसिस उपचार घेणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे प्रत्येक रुग्णांनी या महाडायलिसिस केंद्राचा आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAVANT DATTU NIVRUTTI.**
TO- **DATTU NIVRUTTI SAWANT.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **DATTU NIVRUTTI SAWANT** will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- **SAVANT DATTU NIVRUTTI.**
NEW NAME:- **DATTU NIVRUTTI SAWANT.**
Address :- AT POST KHAMASWADI,SAWANT GALLI,BHIM NAGAR.
TQ.KALAMB, DIST. OSMANABAD -413507
AADHAR NO.- 307063879302 Mob. No.-9665991027

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649